महासंवाद
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

# माणसामधली सृजनशक्ती असेपर्यंत साहित्यही असणार – ज्येष्ठ साहित्यिका डॉ. तारा भवाळकर

### मिरज येथे सतराव्या कामगार साहित्य संमेलनाचे उद्घाटन

by Team DGIPR February 24, 2023 जिल्हा वार्ता, वृत्त विशेष, सांगली




**सांगली दि. २४ (जि.मा.का.) :** सृजनात्मा – निर्माण करणारा आत्मा, म्हणजे माणूस हा सर्वश्रेष्ठ आहे. संस्कृती म्हणजे एकमेकांना जोडून राहणं, प्रेम करणं. यंत्रमानवाला आपल्या मेंदूवर स्वार होऊ देऊ नका. यंत्र माणसाच्या हातात पाहिजे, ते माणसाच्या डोक्यावर जाऊ नये. यंत्र असो, तंत्र असो, कृत्रिम बुध्दिमत्ता असो, तिचा निर्माता, सृजनात्मा हा माणूसच आहे. कृत्रिम बुध्दीलाही माणसांनीच निर्माण केलेलं आहे. माणसामधली सृजनशक्ती आहे, तोपर्यंत त्याची कविताही असणार आहे, त्याची कृतीही असणार आहे, त्याची कलाही असणार आहे, त्याचं साहित्यही असणार आहे आणि माणूसही असणार आहे, असा विश्वास १७ व्या कामगार साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून बोलताना ज्येष्ठ साहित्यिका डॉ. तारा भवाळकर यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळामार्फत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे साहित्यनगरी बालगंधर्व नाट्यमंदिर, मिरज येथे आयोजित १७ व्या कामगार साहित्य संमेलनाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ. राजा दीक्षित यांच्या हस्ते आणि संमेलनाच्या अध्यक्ष डॉ. तारा भवाळकर, कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी महापौर दिग्विजय सूर्यवंशी, ९९ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ नाटककार प्रेमानंद गज्वी, कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद सिंगल, उप सचिव दादासाहेब खताळ, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे कल्याण आयुक्त रविराज इळवे, दक्षिण महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष भिमराव धुळूबुळू यांच्यासह मान्यवर पदाधिकारी, साहित्यिक व कामगार उपस्थित होते.

डॉ. तारा भवाळकर म्हणाल्या, साहित्य, मग ते कोणाचंही, कोणत्याही काळातलं असू देत, निर्माण करणारा माणूसच असतो. आणि प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे ते साहित्य त्याच्या जगण्यातून निर्माण होत असतं. साहित्याचा विषय हा नेहमी माणूसच असतो. मग माणसाचं जगणं, तो ज्या कुटुंबात, समाजस्तरात जन्माला येतो, ज्या वातावरणात वाढतो. त्या वातावरणातलं राजकारण, धर्मकारण, अर्थकारण, शिक्षणव्यवस्था, सांस्कृतिक वातावरण या सगळ्या ताणाबाणांच्या मिश्रतेचा साहित्यात आविष्कार होत असतो. कामगार साहित्यातही हेच होत असतं. कामगारांच्या साहित्यातून श्रमाचा हुंकार बाहेर पडतो, असे त्या म्हणाल्या.

'मी कामगार आहे तळपती तलवार आहे, सारस्वतांनो मी थोडासा गुन्हा करणार आहे!' असे ज्येष्ठ साहित्यिक नारायण सुर्वे म्हणतात, असे सांगून डॉ. भवाळकर म्हणाल्या, गिरण्या कारखान्यातल्या एकाच प्रकारच्या अनुभवी संघभावनेने कामगाराला नवी दृष्टी दिली व नवं भान दिलं. नवी अस्मिता, अभिमान आणि विश्वास दिला. यंत्रयुगातल्या एकानुभवी समूहाला कष्टाचंही सामूहिक एकीकरण झालं. नवयुगाचं अर्थकारण मालक – मजूर संबंध, संघर्ष, मजुरांचे हक्क इत्यादी बाबींच्यामधून नवभान आलेला कामगारवर्ग निर्माण झाला. नवभान आलेला कामगार साहित्यिक, भांडवलशाहीचं नवं अर्थभान घेऊन लिहू-वाचू लागला. मोर्चे यामुळे कामगार चळवळीचं अस्तित्व समाजाला जाणवू लागलं. त्याचा आविष्कार त्याच्या लेखनातूनं होऊ लागला. नवयुगाच्या विविध चळवळीतुन कामगार चळवळ ही पुढे येत गेली. त्या त्या गटातल्या साहित्याची निर्मिती त्यातून झाली.




बुध्दी व श्रम ही दोन्ही बले जेंव्हा एकत्र येतात तेंव्हा नवनिर्मिती होते. मनगट, मन आणि बुध्दी एकत्र आल्याशिवाय प्रगती नाही म्हणूनच श्रमातून सौंदर्य निर्माण करणाऱ्या कामगारांना समाजात आदराचे स्थान दिले पाहिजे, असे प्रतिपादन संमेलनाचे उद्‌घाटक डॉ. राजा दीक्षित यांनी यावेळी केले. १९ व्या शतकात महात्मा फुले, लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांनी कामगारांच्या कष्टाला प्रतिष्ठा मिळवून दिली. नारायण मेघाजी लोखंडे यांनी पहिली कामगार संघटना स्थापना केली. सध्याच्या काळात कामगारांच्या चळवळी मंदावत आहेत. हा जागतिकीकरणाचा दुष्परिणाम आहे. कंत्राटी पध्दतीने कामगार भरती होत असल्याने त्यांना संघटीत होण्यास संधी मिळत नाही, ही चिंतेची बाब असल्याचे ते म्हणाले.

कामगारांनी काम मागण्यापेक्षा देणारे व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त करून पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे म्हणाले, सर्व उद्योगात कामगार केंद्रबिंदू असल्याने त्याच्या श्रमाला प्रतिष्ठा मिळावी. कामगार साहित्य संमेलनाला मोठा वारसा असून यातून कामगारांच्या कलागुणांना वाव देण्याचे काम कामगार कल्याण मंडळामार्फत होत आहे. कामगार साहित्य संमेलनाच्या मंचावरून कामगारांचे प्रश्न, समस्या यावर चर्चा घडते. कामगार कल्याण मंडळाने १७ वे साहित्य संमेलन साहित्य, आरोग्य पंढरी असलेल्या मिरजेत आयोजित केल्याबद्दल कामगार मंडळाचे त्यांनी आभार मानले.

कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद सिंगल म्हणाल्या, कामगार कल्याण मंडळामार्फत कामगारांच्या कल्याणासाठी अनेक उपक्रम राबविले जात आहेत. कामगारांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी नाट्यस्पर्धा आयोजित केल्या जात असून कबड्डी सारख्या राज्यस्तरीय स्पर्धाही घेतल्या जात आहेत. शिक्षण, साहित्य व सांस्कृतिक विषयक कार्यक्रम आयोजित करून कामगारांमध्ये चैतन्य निर्माण करण्याचे काम कल्याण मंडळामार्फत केले जात असल्याचे त्या म्हणाल्या.

कामगार कल्याण मंडळामार्फत साहित्य संमेलनासारखे उपक्रम आयोजित करून कामगाराला एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे काम केले जात आहे, असे कामगार कल्याण आयुक्त रविराज इळवे यांनी प्रास्ताविकात सांगितले. सुमारे १२ वर्षानंतर हे साहित्य संमेलन होत असून या साहित्य संमेलनामध्ये ३ हजार कामगार व कुटुंबियांनी नोंदणी केली असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.
प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी स्थानिक कलाकारांनी महाराष्ट्र गीत तर बाबा नदाफ आणि सहकाऱ्यांनी महात्मा फुले यांचा सत्य सर्वांचे आदिघर, सत्य सर्वांचे माहेर हा अखंड सादर केला. कार्यक्रमात अभिनेत्री रोहिणी कुडेकर, संबळ वादक गौरी वायचळ, अभिनेता अजितकुमार कोष्टी यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.




**१७ व्या कामगार साहित्य संमेलनाचा ग्रंथ दिंडीने शुभारंभ**

दरम्यान, ढोल ताशांच्या निनादात आणि ज्ञानोबा... तुकाराम.. जय जय राम कृष्ण हरी..... गजरात १७ व्या कामगार साहित्य संमेलनाचा शुभारंभ ग्रंथ दिंडीने करण्यात आला. मिरज येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापासून ग्रंथ दिंडीस प्रारंभ झाला. कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ.सुरेश खाडे आणि कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद सिंगल यांच्या हस्ते ग्रंथ पालखीचे पूजन करण्यात आले. तत्पूर्वी पालकमंत्री डॉ सुरेश खाडे व अन्य मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन केले.
छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती शाहू महाराज यांच्या वेशभूषा करून सहभागी झालेले युवक आणि संबळ वाद्य वाजवणारी गौरी वायचळने ग्रंथ दिंडीत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. डोक्यावर तुळस कट्टा, हाती ब्रेल लिपीत लिहिलेली ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा व मुखाने ज्ञानोबा... तुकाराम .. जय..जय राम... कृष्ण हरी... असा हरी नामाचा गजर करीत ग्रंथ दिंडीत सहभागी झालेले कै. सु.धा. घोडावत या अंध शाळेच्या विद्यार्थ्यांनी सर्वांचे लक्ष वेधले. ग्रंथ दिंडीत अंध शाळेच्या विद्यार्थ्यांच्या चमू सोबत वासुदेवानेही सर्वांचे लक्ष वेधून घेतले. कामगार साहित्य संमेलनानिमित्त काढण्यात आलेली ही ग्रंथ दिंडी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापासून सुरुवात होऊन सराफ कट्टा, लक्ष्मी मार्केट, महापालिका कार्यालय, स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर प्रवेशद्वार या मार्गावरून बालगंधर्व नाट्यमंदिर पर्यंत काढण्यात आली. ग्रंथ दिंडीत पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे, कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद सिंगल, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे आयुक्त रविराज इळवे यांच्यासह मान्यवर पदाधिकारी व कामगार विभागाचे अधिकारी सहभागी झाले होते.
ग्रंथ दिंडी बालगंधर्व नाट्यमंदिर येथे पोहोचल्यानंतर विं. दा. बालमंच, डॉ.शंकरराव खरात ग्रंथ दालन आणि लोकशाहीर पट्टे बापूराव कविता भिंतीचे उद्‌घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

महासंवाद
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

# प्रत्येक जिल्ह्यात कामगार भवन उभे करणार – पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे

## मिरज येथे १७ व्या कामगार साहित्य संमेलनाचा समारोप

by Team DGIPR February 26, 2023 सांगली, जिल्हा वार्ता




**सांगली दि. २५ (जि.मा.का.) :** कामगारांच्या व्यथा, अडचणी, त्यांची सुख:दुख: ही मी स्वत: भोगलेली असून यातून कामगारांच्यासाठी काही तरी मार्ग निघावा यासाठी प्रत्येक जिल्ह्याला कामगार भवन उभे करून एकाच छताखाली कामगारांच्या सर्व अडीअडचणी सोडविण्यासाठी प्रयत्नशील आहे, असे प्रतिपादन कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांनी केले.




बालगंधर्व नाट्यमंदिर मिरज येथे १७ व्या कामगार साहित्य संमेलनाच्या समारोपप्रसंगी पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे बोलत होते. यावेळी संमेलनाध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिका डॉ. तारा भवाळकर, ९९ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ नाटककार प्रेमानंद गज्वी, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे कल्याण आयुक्त रविराज इळवे, सहायक कामगार आयुक्त अनिल गुरव, माजी महापौर संगीता खोत यांच्यासह मान्यवर पदाधिकारी, साहित्यिक व कामगार उपस्थित होते.

पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे म्हणाले की, कामगार कष्टाचे काम करत असतो त्यामुळे त्याच्या आरोग्याच्या अडचणी निर्माण होतात. कामगारांना योग्य उपचार मिळावेत यासाठी प्रत्येक जिल्ह्याला मल्टीपर्पज ईएसआय हॉस्पीटलसाठी प्रयत्न करीत असून ६ ईएसआय हॉस्पीटल मंजूर करण्यात आली आहेत. त्यापैकी पुणे येथील मल्टीपर्पज हॉस्पीटलची पायाभरणी लवकरच करण्यात येईल. कामगारांची मुले खेळ, उद्योगात आली पाहिजेत यासाठी प्रत्येक जिल्ह्यात त्यांना योग्य प्रशिक्षण देण्यासाठी वास्तू उभी करण्यासाठी प्रयत्न करीत आहोत. ईएसआय हॉस्पीटलला जोडूनच कामगारांच्या मुलांसाठी मेडिकल कॉलेज काढण्यासाठी प्रयत्न करीत आहोत. कामगारांच्या मुलांना तांत्रिक प्रशिक्षण देण्यासाठीही प्रयत्न सुरू असल्याचे सांगून प्रत्येक वर्षी कामगार साहित्य संमेलन आयोजित करण्याचा मानस त्यांनी यावेळी व्यक्त केला.

डॉ. तारा भवाळकर यांनी साहित्य संमेलन अत्यंत आनंदात पार पडल्याबद्दल सर्वांना धन्यवाद देवून येथून पुढे प्रत्येक वर्षी साहित्य संमेलन व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली. जुन्या व नव्या साहित्याचा इतिहास नोंदविला जावा असे सांगून डॉ. तारा भवाळकर म्हणाल्या की, वर्षभर कवि संमेलन, कथाकथन, परिसंवाद अशा प्रकारचे कार्यक्रम विविध ठिकाणी घ्यावेत त्यामुळे त्या त्या ठिकाणच्या कलाकारांना वाव मिळेल. कामगार ज्या ज्या ठिकाणी काम करतात त्या त्या ठिकाणी त्यांना चांगली स्वच्छतागृहे, स्वच्छ पाणी, खाण्यापिण्याची व्यवस्था अशा सुविधा त्यांना परवडतील अशा पद्धतीने उपलब्ध व्हाव्यात अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.




ज्येष्ठ नाटककार प्रेमानंद गज्वी म्हणाले, कामगार साहित्य चळवळीची अत्यंत आवश्यकता आहे. अनुदवादक फळी निर्माण करून आपल्या भाषेतील साहित्य इतर ठिकाणी पोहचविणे आवश्यक असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

या कार्यक्रम प्रसंगी वैचारिक लेखन, नाट्यलेखन, काव्यलेखन, कथालेखन स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. तसेच विविध लेखकांनी लिहिलेल्या पुस्तकाचे प्रकाशनही यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

प्रास्ताविकात महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे कल्याण आयुक्त रविराज इळवे यांनी साहित्य संमेलनाबद्दल सविस्तर माहिती देवून हे संमेलन यशस्वी करण्यासाठी सहकार्य केलेल्या सर्वांचे आभार मानले. सूत्रसंचालन श्वेता हुले यांनी केले. आभार सहायक कल्याण आयुक्त माधवी सुरवे यांनी मानले. या कार्यक्रमास साहित्यप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सकाळ

# कोंडीत नवक्रांतीची चिन्हे

## डॉ. तारा भवाळकर; १७ व्या कामगार साहित्य संमेलनाचे उद्घाटन



प्रा. तारा भवाळकर

मिरज, ता. २४ : यंत्र-तंत्र असो वा कृत्रिम बुद्धिमत्ता यात माणूसपण हरवत असून, मानवी सहसंबंधात उलथापालथी होताहेत. कामगार चळवळी क्षीण झाल्यात. या कोंडीतच नवक्रांतीची चिन्हे आहेत, असा आशावाद १७ व्या कामगार साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष व लोकसाहित्याच्या अभ्यासक प्रा. तारा भवाळकर यांनी केले. येथील बालगंधर्व नाट्यगृह परिसरातील लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नगरीत आजपासून सुरू झालेल्या दोनदिवसीय साहित्य संमेलनाच्या उद्घाटन सत्रात त्या बोलत होत्या. महाराष्ट्र राज्य विश्वकोष निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ. राजा दीक्षित उद्घाटक होते. कामगार तथा पालकमंत्री सुरेश खाडे, प्रधान सचिव विनिता सिंघल, कामगार कल्याण मंडळाचे आयुक्त रविराज इळवे, महापौर दिग्विजय सूर्यवंशी, नाटककार प्रेमानंद गज्वी, दक्षिण भारत साहित्य सभेचे अध्यक्ष भीमराव धुळूबुळू व्यासपीठावर उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात भारतातील कामगार साहित्य आणि चळवळीचा आढावा घेताना प्रा. भवाळकर यांनी मौखिक परंपरेतून कष्टकरी स्त्रिया आपल्या व्यथा कशा मांडत होत्या

पान ११ वर >



**मिरज (अण्णा भाऊ साठे साहित्य नगरी) : येथे कामगार साहित्य संमेलनाचे उद्घाटन करताना प्रा. तारा भवाळकर, सुरेश खाडे, विनिता सिंघल, रविराज इळवे, भीमराव धुळूबुळू, दिग्विजय सूर्यवंशी, प्रा. राजा दीक्षित.**

### कामगाराचा मंत्री झालो !

संमेलनाचे स्वागताध्यक्ष सुरेश खाडे म्हणाले, 'मी देखील १९९४ पर्यंत मुंबईच्या माझगाव डॉकमध्ये वेल्डर कामगार म्हणून काम करीत होतो. माझे भाऊ व आम्ही उद्योगात आलो. तीस वर्षांत मी कामगार विभागाचा मंत्री झालो. मंत्र्याचा पालकमंत्री झालो. जत व मिरजेतील मतदारांचा यात मोठा वाटा आहे. एका कामगाराला मंत्री होण्याची संधी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाने आणि माझ्या पक्षश्रेष्ठींमुळे मला मिळाली. गेल्या सात महिन्यांत कामगारांच्या हिताच्या अनेक योजना राबवल्या. इथे संमेलन घेण्याचा माझा स्वार्थ इतका आहे की ते माझ्या मतदारसंघात होतेय. हा मला माझा गौरव वाटतो.'

पुण्य नगरी



**सांगली : कामगार साहित्य संमेलनाच्या ग्रंथ दिंडीत सहभागी पालकमंत्री सुरेश खाडे, डॉ. तारा भवाळकर, विनिता वेद सिंगल यांच्यासह मान्यवर.** (छाया : धामणीकर)

# ढोल ताशांचा निनाद, ज्ञानोबा तुकारामांचा गजर

## ■ कामगार साहित्य संमेलनाचा ग्रंथ दिंडीने प्रारंभ
## ■ पालकमंत्र्यांच्याहस्ते ग्रंथ पालखीचे पूजन

**सांगली / प्रतिनिधी**

ढोल ताशांच्या निनादात आणि ज्ञानोबा... तुकाराम... जय जय राम कृष्ण हरी...गजरात १७ व्या कामगार साहित्य संमेलनाचा प्रारंभ ग्रंथ दिंडीने करण्यात आला. मिरज येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापासून ग्रंथ दिंडीस प्रारंभ झाला. कामगारमंत्री, पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे आणि कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद सिंगल यांच्याहस्ते ग्रंथ पालखीचे पूजन करण्यात आले. तत्पूर्वी पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे व अन्य मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन केले.

छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती शाहू महाराज यांच्या वेशभूषा करुन सहभागी झालेले युवक आणि संबळ वाद्य वाजवणारी गौरी वायचळने ग्रंथ दिंडीत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. डोक्यावर तुळस कट्टा, हाती ब्रेल लिपीत लिहिलेली ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा व मुखाने ज्ञानोबा... तुकाराम .. जय..जय राम... कृष्ण हरी... असा हरी नामाचा गजर करीत ग्रंथ दिंडीत सहभागी झालेले कै. सु. धा. घोडावत या अंध शाळेच्या विद्यार्थ्यांनी सर्वांचे लक्ष वेधले. ग्रंथ दिंडीत अंध शाळेच्या विद्यार्थ्यांच्या चमू सोबत वासुदेवानेही सर्वांचे लक्ष वेधून घेतले. कामगार साहित्य संमेलनानिमित्त काढण्यात आलेली ही ग्रंथ दिंडी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापासून सुरुवात होऊन सराफ कट्टा, लक्ष्मी मार्केट, महापालिका कार्यालय, स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर प्रवेशद्वार या मार्गावरून बालगंधर्व नाट्यमंदिरपर्यंत काढण्यात आली. ग्रंथ दिंडीत पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे, कामगार ▶▶ पान २ वर

पुण्य नगरी

# यंत्रमानवाला मेंदुवर स्वार होऊ देवू नका

## तारा भवाळकर

**सांगली / प्रतिनिधी**

सृजनात्मा निर्माण करणारा आत्मा म्हणजे माणूस हा सर्वश्रेष्ठ आहे. संस्कृती म्हणजे एकमेकांना जोडून राहणं, प्रेम करणं. यंत्रमानवाला आपल्या मेंदुवर स्वार होऊ देवू नका. यंत्र माणसाच्या हातात पाहिजे, ते माणसाच्या डोक्यावर जावू नये. यंत्र असो, तंत्र असो, कृत्रिम बुद्धिमत्ता असो, तिचा निर्माता, सृजनात्मा हा माणूसच आहे. कृत्रिम बुद्धिलाही माणसांनीच निर्माण केलेलं आहे. माणसामधली सृजनशक्ती आहे, तोपर्यंत त्याची कविताही असणार आहे, त्याची कृतीही असणार आहे, त्याची कलाही असणार आहे, त्याचं साहित्यही असणार आहे आणि माणूसही असणार आहे, असा विश्वास १७ व्या कामगार साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरुन बोलताना ज्येष्ठ साहित्यिका डॉ. तारा भवाळकर यांनी व्यक्त केला.



**मिरज : येथे कामगार साहित्य संमेलनाचे उद्घाटन दीपप्रज्वलनाने करताना तारा भवाळकर, सुरेश खाडे. समवेत दिग्विजय सूर्यवंशी, डॉ. राजा दीक्षित, प्रेमानंद गज्वी, विनिता वेद सिंगल आदी.**

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळामार्फत लोकशाहीर अण्णा भाऊ साठे साहित्यनगरी बालगंधर्व नाट्यमंदिर, मिरज येथे आयोजित १७ व्या कामगार साहित्य संमेलनाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ. राजा दीक्षित यांच्याहस्ते आणि संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर, पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी महापौर दिग्विजय सूर्यवंशी, ९९ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ नाटककार प्रेमानंद गज्वी, कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद सिंगल, उप सचिव दादासाहेब खताळ, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे कल्याण आयुक्त रविराज इळवे, दक्षिण महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष भीमराव धुळूबुळू यांच्यासह मान्यवर पदाधिकारी, साहित्यिक व कामगार उपस्थित होते.

डॉ. तारा भवाळकर म्हणाल्या, साहित्य, मग ते कोणाचंही, कोणत्याही काळातलं असू देत, निर्माण करणारा माणूसच असतो. आणि प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे ते साहित्य त्याच्या जगण्यातून निर्माण होत असतं. साहित्याचा विषय हा नेहमी माणूसच असतो. मग माणसाचं जगणं, तो ज्या कुटुंबात, समाजस्तरात जन्माला येतो, ज्या वातावरणात वाढतो. त्या वातावरणातलं राजकारण, धर्मकारण, अर्थकारण, शिक्षण व्यवस्था, सांस्कृतिक वातावरण या सगळ्या ताणाबाणांच्या मिश्रतेचा साहित्यात आविष्कार होत असतो. बुद्धी व श्रम ही दोन्ही बले जेंव्हा एकत्र येतात तेंव्हा नवनिर्मिती होते. मनगट, मन आणि बुद्धी एकत्र आल्याशिवाय प्रगती नाही. म्हणूनच श्रमातून सौंदर्य निर्माण करणाऱ्या कामगारांना समाजात आदराचे स्थान दिले पाहिजे, असे प्रतिपादन संमेलनाचे उद्घाटक डॉ. राजा दीक्षित यांनी यावेळी केले.

कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद सिंगल म्हणाल्या, कामगार कल्याण मंडळामार्फत कामगारांच्या कल्याणासाठी अनेक उपक्रम राबविले जात आहेत.

कामगारांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी नाट्यस्पर्धा आयोजित केल्या जात असून कबड्डीसारख्या राज्यस्तरीय स्पर्धाही घेतल्या जात आहेत. कार्यक्रमात अभिनेत्री रोहिणी कुडेकर, संबळ वादक गौरी वायचळ, अभिनेता अजितकुमार कोष्टी यांचा मान्यवरांच्याहस्ते सन्मान करण्यात आला.

Smart Sangli Edition
Feb 25, 2023 Page No. 02
Powered by : eReleGo.com

लोकमत

# माणसातील सृजनशक्ती असे पर्यंत साहित्यही असणार

## तारा भवाळकर : मिरजेत कामगार साहित्य संमेलनाचे उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

**मिरज :** यंत्र असो, तंत्र असो, कृत्रिम बुद्धिमत्ता असो, तिचा निर्माता, सृजनात्मा हा माणूसच आहे. कृत्रिम बुद्धीलाही माणसांनीच निर्माण केले आहे. माणसामधली सृजनशक्ती आहे, तोपर्यंत त्याची कृती, कला आणि त्याचे साहित्यही असणार आणि माणूसही असणार, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिका डॉ. तारा भवाळकर यांनी कामगार साहित्य संमेलनाच्या अध्यक्षस्थानावरून केले.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळामार्फत मिरजेच्या बालगंधर्व नाट्यमंदिरातील लोकशाहीर अण्णा भाऊ साठे साहित्यनगरीत आयोजित १७ व्या कामगार साहित्य संमेलनास शुक्रवारी प्रारंभ झाला. यावेळी त्या बोलत होत्या. महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ. राजा दीक्षित यांच्या हस्ते उद्घाटन झाले. यावेळी कामगार मंत्री सुरेश खाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. महापौर दिग्विजय सूर्यवंशी, अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष प्रेमानंद गज्वी, कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद-सिंगल, उपसचिव दादासाहेब खताळ, कामगार कल्याण मंडळाचे कल्याण आयुक्त रविराज इळवे, दक्षिण महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष भीमराव धुळूबुळू उपस्थित होते.



**मिरज येथे शुक्रवारी कामगार कल्याण मंडळामार्फत आयोजित कामगार साहित्य संमेलनाचे उद्घाटन संमेलनाध्यक्षा डॉ. तारा भवाळकर, कामगारमंत्री सुरेश खाडे यांच्या हस्ते झाले. यावेळी कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद सिंघल, आयुक्त रविराज इळवे, दक्षिण महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष भीमराव धुळूबुळू, महापौर दिग्विजय सूर्यवंशी, राज्य विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ. राजा दीक्षित उपस्थित होते.**

### कामगारांना समाजात मानाचे स्थान हवे

संमेलनाचे उद्घाटक डॉ. राजा दीक्षित म्हणाले, बुद्धी व श्रम ही दोन्ही बले जेव्हा एकत्र येतात तेव्हा नवनिर्मिती होते. मनगट, मन आणि बुद्धी एकत्र आल्याशिवाय प्रगती नाही म्हणूनच श्रमातून सौंदर्य निर्माण करणाऱ्या कामगारांना समाजात आदराचे स्थान दिले पाहिजे.

डॉ. भवाळकर म्हणाल्या, गिरण्या, कारखान्यांतल्या एकाच प्रकारच्या अनुभवी संघभावनेने कामगाराला नवी दृष्टी दिली व नवे भान दिले. नवभान आलेला कामगार साहित्यिक, भांडवलशाहीचे नवे अर्थभान घेऊन लिहू-वाचू लागला. मोर्चांमुळे कामगार चळवळीचे अस्तित्व समाजाला जाणवू लागले. त्याचा आविष्कार त्याच्या लेखनातून होऊ लागला.

नवयुगाच्या विविध चळवळींतून कामगार चळवळ पुढे येत गेली. त्या त्या गटातल्या साहित्याची निर्मिती त्यातून झाली. साहित्य, कामगारांच्या साहित्यातून श्रमाचा हुंकार बाहेर पडतो.

पुढारी

# कामगार चळवळ टिकली, वाढली पाहिजे

## मिरजेत कामगार साहित्य संमेलनात साहित्यिका डॉ. तारा भवाळकर यांचे मत

**मिरज : पुढारी वृत्तसेवा**

देशातील कामगार चळवळीने कामगारांना अस्मिता व प्रतिष्ठा याचे भान आणून दिले. सध्याची स्थिती पाहता कामगार चळवळ टिकली आणि वाढली पाहिजे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिका डॉ. तारा भवाळकर यांनी शुक्रवारी केले.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ आयोजित १७ वे कामगार साहित्य संमेलन आज मिरजेत सुरू झाले. दोन दिवस हे संमेलन चालणार आहे. यावेळी संमेलनाच्या अध्यक्षा म्हणून साहित्यिका भवाळकर बोलत होत्या. यावेळी महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ. राजा दीक्षित हे उद्घाटक व कामगार मंत्री सुरेश खाडे हे स्वागताध्यक्ष म्हणून उपस्थित होते.

सकाळी छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापासून ग्रंथदिंडी निघाली. ही दिंडी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे साहित्यनगरी बालगंधर्व नाट्य मंदिरापर्यंत आली. साहित्य संमेलनामध्ये पहिल्या सत्रात 'चला उद्योजक होऊया' या विषयावर डॉ. विठ्ठल कामत, रामदास माने, हनुमंतराव गायकवाड, गिरीश चितळे यांची मिलिंद कुलकर्णी यांनी मुलाखत घेतली. त्यानंतर कामगार चळवळीची कथा आणि व्यथा, व्यसनमुक्तीची लढाई, मराठी साहित्यात कामगार जीवनाचे चित्र शोधताना या विषयावर परिसंवाद झाले. त्यानंतर काव्यधारा हे कवी संमेलन झाले.




**मिरज : संमेलनात बोलताना साहित्यिका डॉ. तारा भवाळकर. व्यासपीठावर कामगार मंत्री सुरेश खाडे, डॉ. राजा दीक्षित.** (छाया : जालिंदर हुलवान)

अध्यक्षीय भाषणात साहित्यिका भवाळकर म्हणाल्या, आज सगळीकडे केवळ कष्टकरीच नाही तर बुद्धिजीवी सुद्धा कंत्राटी पद्धतीने काम करीत आहे. शेती हमाल, माथाडी हमाल सगळेच हे त्या वर्गामध्ये जातात. एक प्रचंड अनिश्चितता सगळीकडे भरून राहिली आहे. संपासाठी ज्या संघटना होत्या. त्या संघटनांवर प्रचंड प्रतिबंध आलेले आहेत. त्यामुळे महागाईभत्ता, बोनस, वगैरेसाठी जे संप चालत असत त्याच्यावर बंधने आलेली आहेत. संपाद्वारे व्यक्त होणं हे आता दुरापास्त होत चालले आहे. कंत्राटी कामगारांमध्ये वाढ होत चाललेली आहे.

दैनिक
बातम्यांचा राजा
जनप्रवास
सांगली ▮ कोल्हापूर
Website : janpravas.in ▸ रविवार, दि. २६ फेब्रुवारी २०२३ ▸ पान नं. - ३



# मिरजेतील कामगार साहित्य संमेलनाचा समारोप

जनप्रवास । प्रतिनिधी

मिरज : मिरजेत दोन दिवस सुरू असलेल्या १७ व्या कामगार साहित्य संमेलनाचा समारोप कवि संमेलन, परिसंवाद, कथाकथन, अभिरूप न्यायालय, पुस्तक प्रकाशन सोहळ्याने झाला. समारोप प्रसंगी कामगार राज्यमंत्री तथा सांगली जिल्हा पालकमंत्री ना.डॉ.सुरेशभाऊ खाडे, संमेलनाध्यक्ष डॉ.तारा भवाळकर तसेच ज्येष्ठ नाटककार प्रेमानंद गज्वी उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ नाटककार प्रेमानंद गज्वी यांनी कामगार साहित्य संमेलने कायम भरली पाहिजेत. कामगारांच्या चळवळी याबाबत प्रबंध सादर करावेत.



कामगार साहित्य संमेलनाचा समारोप सोहळ्यात बोलताना जेष्ठ नाटककार प्रेमानंद गज्वी. यावेळी पालकमंत्री सुरेशभाऊ खाडे, जेष्ठ साहित्यीका तारा भवाळकर आदी.

त्यासाठी कोणीतरी पुढे आले पाहिजेत. साहित्य संमेलने ही आपल्यांसाठीच असतात. आपल्या भाषेतील साहित्य निर्माण झालं तर दाद मिळाली पाहिजे. आपल्या मातृभाषेतील नाटक परदेशात जात असते. त्यावेळी सगळा खर्च आम्हालाच करावा लागतो. त्यासाठीही काही आर्थिक तरतूद केली पाहिजे असेही म्हणाले.

काव्य मैफलीमध्ये कविता श्रमाची यावर अनेक कवींनी आपल्या कविता सादर केल्या. तर परिसंवादाचा कार्यक्रम झाला. तसेच प्रा.आण्णासाहेब खोत यांचे कथाकथन पार पडले. अभिरूप न्यायालय सादर करण्यात आले यामध्ये आरोपीच्या पिंजर्यात हिवरे बाजारचे सरपंच पोपटराव पवार, न्यायाधिश म्हणून कल्याण आयुक्त रविराज इळवे यांनी अत्यंत उत्तम भूमिकार पार पाडली. तर सरकारी वकील म्हणून उध्दव कानडे, आरोपीचे वकील म्हणून श्रीकांत चौगुले यांनी भूमिका पार पाडली. तर साक्षीदाराच्या भूमिकेत अरूण म्हात्रे, पुरूषोत्तम सदाफुले, डॉ. मुकुंद कुळे, श्रीमती सुनिताराजे पवार, बाळासाहेब बाणखेले, इन्स्पेक्टरच्या भूमिकेत सदाम भोरे, पोलिसाच्या भूमिकेत बाजीराव सातपुते, सुरेश कंक, अरूण गराडे, प्रभाकर वाघोले यांनी भूमिका पार पडल्या.

कामगार राज्यमंत्री तथा पालकमंत्री ना. डॉ.सुरेशभाऊ खाडे यांनी कामागरांसाठी प्रत्येक जिल्ह्यातील रूग्णालये, महाविद्यालये स्थापन करणार असून तसेच प्रत्येक क्षेत्रात कामगारांचे मुलं शिकली पाहिजेत. त्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. कामगार हा प्रत्येक क्षेत्रातील मुख्य घटक आहे. कामगार साहित्य संमेलन घेतली जातील. असेही यावेळी ना.डॉ.सुरेशभाऊ खाडे म्हणाले.

दैनिक
बातम्यांचा राजा
जनप्रवास

# यंत्रांच्या आहारी गेल्याने श्रमशक्ती विसरण्याचा मोठा धोका

## मिरजेत सतराव्या कामगार साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून डॉ. तारा भवाळकर यांचे प्रतिपादन



बालगंधर्व नाट्यगृहात अण्णा भाऊ साठे नगरीत आयोजित करण्यात आलेल्या सतराव्या कामगार साहित्य संमेलनाचा शुभारंभ दीपप्रज्वलन करून करताना प्रा. तारा भवाळकर, यावेळी पालकमंत्री सुरेशभाऊ खाडे आदी.

जनप्रवास । प्रतिनिधी

मिरज : यंत्रामुळे श्रमशक्ती विसरण्याचा धोका आहे, यंत्र युगामुळे माणूस यंत्राला शरण जात आहे. यंत्र आपल्या हातातच हवे, डोक्यात जाता कामा नये. जर यंत्राने मानवावर अतिक्रमण केले तर मानव मानवच उरणार नाही, असे मत लोकसाहित्याच्या अभ्यासिका डॉ. तारा भवाळकर यांनी व्यक्त केले.

मिरजेतील बालगंधर्व नाट्यगृहात अण्णा भाऊ साठे नगरीत आयोजित करण्यात आलेल्या सतराव्या कामगार साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून डॉ. भवाळकर बोलत होत्या. संमेलनाचे उद्घाटन विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ. राजा दीक्षित यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्वागताध्यक्ष राज्याचे कामगार व जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे हे स्वागताध्यक्ष होते, तर महावीर दिग्विजय सूर्यवंशी, नाटककार प्रेमानंद गज्वी, प्रधान सचिव विनीता वेद सिंगल, कल्याण आयुक्त रविराज इळवे आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. भवाळकर पुढे म्हणाल्या, परंपरेतील श्रमसंस्कृतीचा आढावा घेत असताना पारंपरिक ओव्यांची जोड देत महिलांना यंत्रयुगामुळेच श्रममुक्ती मिळाल्याचे सांगितले. कामगार चळवळीतून आलेल्या कामगार साहित्यिकांनी कामगारांना हक्काची जाणीव करून देत असताना प्रतिष्ठा, स्वाभिमानाचीही जाणीव करून दिली. यातूनच आजची महानगरे ही यंत्रयुगाचीच देणं बनली आहेत.

यंत्रामुळे कितीही प्रगती साधली तरी यंत्र बनविणारे हात हे मानवीच असून सुजनता यामध्ये आहे. यंत्र आहारी गेला तर मानव आपली श्रमसंस्कृती विसरण्याचा धोका आहे. कृत्रिम बुध्दीमत्तेच्या जोरावर सुखसुविधा उपलब्ध होऊ शकतात. मात्र, जगण्यातील कलात्मकता ही केवळ सृजनातूनच मिळू शकते. यामुळे माणूस म्हणून टिकून राहण्यासाठी कलात्मकताही जोपासण्याची गरज आहे. भाकरी जशी जगण्यासाठी आवश्यक आहे तसेच सौंदर्य हे कसे जगायचे हेच शिकवते.

यावेळी उद्घाटक म्हणून बोलताना डॉ. दीक्षित म्हणाले, बुध्दी आणि श्रम हे एकत्र नांदत असतील तरच माणूस घडत असतो. श्रमातून सौंदर्य आणि संपत्ती निर्माण होते. साठोत्तर काळातच कामगार चळवळीतून जन्माला आलेल्या साहित्यातून साहित्याचे दलित, कामगार साहित्य निर्माण झाले. आज चळवळी मंदावल्याचे चित्र दिसत आहे. यावेळी स्वागताध्यक्ष या नात्याने बोलताना पालकमंत्री खाडे यांनी संमेलन आयोजनामागील हेतू विषद केला तर, कल्याण आयुक्त इळवे यांनी प्रास्ताविक केले. संमेलनापूर्वी छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापासून ग्रंथ दिंडी काढण्यात आली. यामध्ये शहरातील डॉ. विनोद परमशेट्टी, डॉ. दयानंद नाईक, द. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्रा. धुळूबुळू, डॉ. विकास पाटील आदी सहभागी झाले होते.

### संमेलनाकडे खासदार, आमदारांची पाठ

या साहित्य संमेलनासाठी खा. संजयकाका पाटील व खा. धैर्यशिल माने यांच्यासह जिल्ह्यातील आमदार सुधीर गाडगीळ, श्रीमती सुमनताई पाटील, मानसिंगराव नाईक, जयंत पाटील, डॉ. विश्वजित कदम, आ. विक्रमसिंह सावंत, आ. अनिल बाबर, आ. अरूण लाड, आ. जयंत आसगावकर आदींना आमंत्रित करण्यात आले होते. मात्र, या सर्व विशेष अतिथींनी संमेलनाकडे पाठ फिरवली.

सामना

# माणसातील सृजनशक्ती असेपर्यंत साहित्यही असणार - डॉ. तारा भवाळकर

सांगली, दि. २४ (प्रतिनिधी) - सृजनात्मा निर्माण करणारा आत्मा, म्हणजे माणूस हा सर्वश्रेष्ठ आहे. यंत्र माणसाच्या हातात पाहिजे, ते माणसाच्या डोक्यावर जाऊ नये. यंत्र असो, तंत्र असो, कृत्रिम बुद्धिमत्ता असो, तिचा निर्माता, सृजनात्मा हा माणूसच आहे. कृत्रिम बुद्धीलाही माणसांनीच निर्माण केलेले आहे. त्यामुळे माणसातील सृजनशक्ती आहे, तोपर्यंत त्याचे साहित्यही राहील, असा विश्वास १७व्या कामगार साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा, ज्येष्ठ साहित्यिका डॉ. तारा भवाळकर यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळामार्फत लोकशाहीर अण्णा भाऊ साठे साहित्यनगरी बालगंधर्व नाट्यमंदिर, मिरज येथे आयोजित १७व्या कामगार साहित्य संमेलनाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ. राजा दीक्षित यांच्या हस्ते आणि संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर, कामगारमंत्री तथा पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी महापौर दिग्विजय सूर्यवंशी, ९९व्या अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष प्रेमानंद गज्वी, प्रधान सचिव विनिता वेद सिंगल, उपसचिव दादासाहेब खताळ, कामगार कल्याण आयुक्त रविराज इळवे, दक्षिण महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष भीमराव धुळूबुळू उपस्थित होते.

डॉ. तारा भवाळकर म्हणाल्या, साहित्य कोणाचेही, कोणत्याही काळातले असू देत, निर्माण करणारा माणूसच असतो. प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे ते साहित्य त्याच्या जगण्यातून निर्माण होत असते. कामगार साहित्यातही हेच होत असते. कामगारांच्या साहित्यातून श्रमाचा हुंकार बाहेर पडतो. गिरण्या, कारखान्यातल्या एकाच प्रकारच्या अनुभवी संघभावनेने कामगाराला नवी दृष्टी व नवे भान दिले. हाच कामगार साहित्यिक, भांडवलशाहीचे नवे अर्थभान घेऊन लिहू-वाचू लागला. मोर्चे, आंदोलनांमुळे कामगार चळवळीचे अस्तित्व समाजाला जाणवू लागले. त्याचा आविष्कार त्याच्या लेखनातून होऊ लागला. त्या त्या



गटातल्या साहित्याची निर्मिती त्यातून झाली.

डॉ. राजा दीक्षित म्हणाले, बुद्धी व श्रम ही दोन्ही बलस्थाने एकत्र येतात तेव्हा नवनिर्मिती होते. म्हणूनच श्रमातून सौंदर्य निर्माण करणाऱ्या कामगारांना समाजात आदराचे स्थान दिले पाहिजे.

पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे म्हणाले, सर्व उद्योगांत कामगार केंद्रबिंदू असल्याने त्याच्या श्रमाला प्रतिष्ठा मिळावी. कामगार साहित्य संमेलनाला मोठा वारसा असून, यातून कामगारांच्या कलागुणांना वाव देण्याचे काम कामगार कल्याण मंडळामार्फत होत आहे.

लोकमत

# आय विटनेस संमेलनाच्या ग्रंथदिंडीत फुगडीचा फेर



मिरज येथे शुक्रवारी महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळामार्फत आयोजित १७ व्या कामगार साहित्य संमेलनानिमित्त शहरातून ग्रंथदिंडी काढण्यात आली. यावेळी पारंपरिक वेशभूषेत महिलांनी फुगडीचा फेर धरला.

दैनिक
बातम्यांचा राजा
जनप्रवास

# कामगार साहित्य संमेलनासाठी मिरज नगरी सज्ज

- रविराज इळवे

जनप्रवास । प्रतिनिधी

**मिरज : मिरज नगरी १७ व्या राज्यस्तरीय कामगार साहित्य संमेलनासाठी सज्ज झाली असून एकूण ३००० कामगार व कामगार कुटुंबियांनी संमेलनासाठी नावनोंदणी केली आहे. ज्येष्ठ साहित्यिका डॉ. तारा भवाळकर यांच्या अध्यक्षतेखाली दि. २४ व २५ फेब्रुवारी रोजी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे साहित्य नगरी, बालगंधर्व नाट्यमंदिर, मिरज येथे हे संमेलन होणार आहे.**

महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ. राजा दीक्षित या संमेलनाचे उद्घाटक असून कामगार मंत्री ना. डॉ. सुरेश (भाऊ) खाडे संमेलनाचे स्वागताध्यक्ष आहेत. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे कल्याण आयुक्त तथा संमेलनाचे प्रमुख कार्यवाह रविराज इळवे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

रविराज इळवे म्हणाले, संमेलनाच्या उद्घाटनापूर्वी शुक्रवार, दि. २४ फेब्रुवारी रोजी सकाळी ७.४५ वाजता ग्रंथदिंडी काढण्यात येणार आहे. मंगळवार पेठेतील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापासून ग्रंथदिंडीस सुरुवात होईल. सराफ कट्टा, लक्ष्मी मार्केट, मनपा कार्यालय या मार्गाने स्वा. वि. दा. सावरकर प्रवेशद्वार बालगंधर्व नाट्यमंदिर येथे ग्रंथदिंडीचा समारोप होईल.

रविराज इळवे पुढे म्हणाले, सकाळी ९.३५ वाजता विंदा बालमंचाचे उद्घाटन करण्यात येईल. त्यानंतर डॉ. शंकरराव खरात ग्रंथ दालनाचे तसेच लोकशाहीर पट्टे



बापूराव कविता भिंतीचे उद्घाटन करण्यात येणार आहे. संमेलनाचा उद्घाटन सोहळा तसेच सर्व सत्रांचे आयोजन डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारमंच येथे होणार आहे. सकाळी १० वाजता संमेलनाचा उद्घाटन सोहळा होईल.

ते पुढे म्हणाले, संमेलनाच्या पहिल्या सत्रात चला उद्योजक होऊ या विषयावर डॉ. विठ्ठल कामत (कामत हॉटेल्स ग्रुप लि.), रामदास माने (माने ग्रुप ऑफ कंपनीज), हनुमंतराव गायकवाड (भारत विकास ग्रुप इंडिया लि.), गिरीश चितळे (चितळे उद्योग समूह) या उद्योजकांची प्रकट मुलाखत होणार आहे. दोन दिवस चालणाऱ्या या संमेलनात कामगार चळवळीची कथा आणि व्यथा, मराठी साहित्यात कामगार जीवनाचे चित्र शोधताना, आम्ही का लिहितो?, व्यसनमुक्तीची लढाई या विषयांवर परिसंवादांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचबरोबर कविसंमेलन आणि काव्य मैफलीचा रसिक प्रक्षेकांना आस्वाद घेता येणार आहे.

संमेलनात कथाकथनाचे सादरीकरण होणार असून अभिरुप न्यायालय देखील भरवले जाणार आहे. आदर्श गाव हिवरे बाजारचे सरपंच पद्मश्री पोपटराव पवार यांचा अभिरुप न्यायालयात सहभाग असेल. कामगार साहित्य संमेलनाचे थेट प्रक्षेपण मंडळाच्या महाकल्याण युट्यूब चॅनलवर तसेच राज्यस्तरीय कामगार साहित्य संमेलन २०२३ या नावाने तयार करण्यात आलेल्या फेसबुक पेजच्या माध्यमातून करण्यात येणार आहे, अशी माहितीही महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे कल्याण आयुक्त तथा संमेलनाचे प्रमुख कार्यवाह रविराज इळवे यांनी दिली.

# मिरज येथे २४ पासून १७ वे राज्यस्तरीय कामगार साहित्य संमेलन

## संमेलनाध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. तारा भवाळकर, उद्घाटक डॉ. राजा दीक्षित

संभाजीनगर दि. १९ (प्रतिनिधी) - १७ वे राज्यस्तरीय कामगार साहित्य संमेलन २४ व २५ फेब्रुवारी रोजी सांगली जिल्ह्यातील मिरज येथील बालगंधर्व नाट्यमंदिरात आयोजित करण्यात आले आहे. संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. तारा भवाळकर तर उद्घाटक म्हणून महाराष्ट्र विश्वकोषनिर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ. राजा दीक्षित यांची उपस्थिती राहणार आहे.

कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनीता वेद सिंगल मार्गदर्शक तर महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे कल्याण आयुक्त रविराज इळवे हे संमेलनाचे प्रमुख कार्यवाह आहेत. शुक्रवार, २४ रोजी सकाळी ग्रंथ दिंडी व उद्घाटन सोहळा होईल. पहिल्या सत्रात 'चला उद्योजक होऊया' विषयावर डॉ. विठ्ठल कामत (कामत हॉटेल्स ग्रुप लि.), गिरीश चितळे (चितळे उद्योग समूह), हनुमंतराव गायकवाड (भारत विकास ग्रुप इंडिया लि.) या उद्योजकांची प्रकट मुलाखत होणार आहे. संमेलनात कामगार चळवळीची कथा आणि व्यथा, मराठी साहित्यात कामगार जीवनाचे चित्र शोधताना, आम्ही का लिहितो?, व्यसनमुक्तीची लढाई या विषयांवर परिसंवाद, मान्यवर कामगार कवींचे कविसंमेलन आणि काव्य मैफील, कथाकथन, अभिरूप न्यायालय रंगणार आहे. यात आदर्श गाव हिवरे बाजारचे सरपंच पद्मश्री पोपटराव पवार अभिरुप न्यायालयात आरोपीच्या पिंजऱ्यात असतील.

संमेलनासाठी इच्छुक कामगारांची नोंदणी करण्यात येत असून, अधिक माहितासाठी महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या www.public.mlwb.in या संकेतस्थळास अथवा नजीकच्या कामगार कल्याण केंद्रास व कार्यालयास भेट द्यावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

यापूर्वी कविवर्य नारायण सुर्वे, बाबुराव बागूल, डॉ. आनंद यादव, डॉ. सदा कऱ्हाडे, अरुण साधू, उत्तम तुपे, शिवाजी सावंत, नामदेव ढसाळ, डॉ. विठ्ठल वाघ, मधु मंगेश कर्णिक, प्रा. केशव मेश्राम, डॉ. अनिल अवचट, उत्तम कांबळे, फ.मू. शिंदे, डॉ. रुपा कुलकर्णी, रामदास फुटाणे यांनी कामगार साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविले आहे.

शब्दांना सत्याची धार

प्रहार

मुंबई, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, नाशिक येथून एकाचवेळी प्रसिद्ध • वर्ष १९ • अंक १२५ • पाने १४ (कोलाजसह) • ₹ ५.००

## संमेलनाध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिका डॉ. तारा भवाळकर

# १७ वे राज्यस्तरीय कामगार साहित्य संमेलन मिरजेत

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

सतराव्या राज्यस्तरीय कामगार साहित्य संमेलनाचे दि. २४ व २५ फेब्रुवारी २०२३ रोजी मिरज, जि. सांगली येथे आयोजन करण्यात आले असून संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिका डॉ. तारा भवाळकर यांची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती कामगार मंत्री तथा संमेलनाचे स्वागताध्यक्ष डॉ. सुरेश (भाऊ) खाडे यांनी दिली. मंत्रालय मुंबई येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

डॉ. भवाळकर यांनी लोकसंस्कृतीविषयी विपुल लेखन केले असून मराठी विश्वकोश, मराठी ग्रंथकोश आदी महत्वाच्या कार्यात त्यांचे योगदान असल्याचे डॉ. सुरेश खाडे यांनी सांगितले तसेच नाटक, कथासंग्रह, वैचारिक, ललित लेखन, समिक्षात्मक अशा विविध प्रकारची साहित्यनिर्मिती त्यांनी केली आहे. त्यामुळे संमेलनाध्यक्ष पदासाठी त्यांची निवड करण्यात आली आहे.

महाराष्ट्र विश्वकोष निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ. राजा दीक्षित या संमेलनाचे उद्घाटक असून कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनीता वेद सिंगल मार्गदर्शक, तर महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे कल्याण आयुक्त रविराज इळवे संमेलनाचे प्रमुख कार्यवाह आहेत. बालगंधर्व नाट्य मंदिर, मिरज येथे हे संमेलन होणार आहे. शुक्रवार, दि.२४ फेब्रुवारी रोजी सकाळी ग्रंथदिंडी काढण्यात येईल. सकाळी १० वाजता संमेलनाचा उद्घाटन सोहळा होईल. संमेलनाच्या पहिल्या सत्रात 'चला उद्योजक होऊ या' या विषयावर डॉ. विठ्ठल कामत (कामत हॉटेल्स ग्रुप लि.), गिरीश चितळे (चितळे उद्योग समूह), हनुमंतराव गायकवाड (भारत विकास ग्रुप इंडिया लि.) या उद्योजकांची प्रकट मुलाखत होणार आहे.

दोन दिवस चालणाऱ्या या संमेलनात कामगार चळवळीची कथा आणि व्यथा, मराठी साहित्यात कामगार जिवनाचे चित्र शोधताना, आम्ही का लिहितो?, व्यसनमुक्तीची लढाई या विषयांवर परिसंवादांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचबरोबर कवींचे कवी संमेलन आणि काव्य मैफिलीचा रसिक प्रक्षेकांना आस्वाद घेता येणार आहे. निमंत्रित तसेच कामगार कवींचा कवी संमेलनात सहभाग असेल. संमेलनात कथाकथनाचे सादरीकरण होणार असून अभिरूप न्यायालयदेखील भरवले जाणार आहे.

आदर्श गाव हिवरे बाजारचे सरपंच पद्मश्री पोपटराव पवार अभिरूप न्यायालयात आरोपीच्या पिंजऱ्यात असतील. संमेलनासाठी इच्छुक कामगारांची नोंदणी करण्यात येत असून अधिक माहितासाठी महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या www.public.mlwb.in या संकेतस्थळास अथवा नजीकच्या कामगार कल्याण केंद्रास व कार्यालयास भेट द्यावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

पुण्य नगरी

# यंदाचे १७ वे राज्यस्तरीय कामगार साहित्य संमेलन मिरजेत होणार

## संमेलनाध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिका डॉ. तारा भवाळकर, उद्घाटक डॉ. राजा दीक्षित

**मुंबई :** १७ व्या राज्यस्तरीय कामगार साहित्य संमेलनाचे २४ व २५ फेब्रुवारी रोजी मिरज (जि. सांगली) येथे आयोजन करण्यात आले आहे. या संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिका डॉ.तारा भवाळकर यांची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती कामगार मंत्री तथा संमेलनाचे स्वागताध्यक्ष डॉ. सुरेश खाडे यांनी दिली आहे.

बालगंधर्व नाट्य मंदिर, मिरज, जि. सांगली येथे संमेलन होणार आहे. शुक्रवार, २४ फेब्रुवारी रोजी सकाळी ग्रंथदिंडी काढण्यात येईल. सकाळी १० वाजता संमेलनाचा उद्घाटन सोहळा होईल. संमेलनाच्या पहिल्या सत्रात 'चला उद्योजक होऊ या' विषयावर डॉ. विठ्ठल कामत (कामत हॉटेल्स ग्रुप लि.), गिरीश चितळे (चितळे उद्योग समूह), हनुमंतराव गायकवाड (भारत विकास ग्रुप इंडिया लि.) या उद्योजकांची प्रकट मुलाखत होणार आहे.

महाराष्ट्र विश्वकोष निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ. राजा दीक्षित या संमेलनाचे उद्घाटक असून कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनीता वेद सिंगल मार्गदर्शक, तर महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे कल्याण आयुक्त रविराज इळवे संमेलनाचे प्रमुख कार्यवाह आहेत. निमंत्रित तसेच कामगार कवींचा कविसंमेलनात सहभाग असेल. संमेलनात कथाकथनाचे सादरीकरण होणार असून अभिरुप न्यायालयदेखील भरवले जाणार आहे. आदर्श गाव हिवरे बाजारचे सरपंच पद्मश्री पोपटराव पवार अभिरूप न्यायालयात आरोपीच्या पिंजऱ्यात असतील, असेही माहिती देताना डॉ. सुरेश खाडे यांनी सांगितले.

संमेलनासाठी इच्छुक कामगारांची नोंदणी करण्यात येत असून अधिक माहितीसाठी महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या www.public.mlwb.in या संकेतस्थळास अथवा नजीकच्या कामगार कल्याण केंद्रास व कार्यालयास भेट द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

डॉ. तारा भवाळकर यांनी लोकसंस्कृतीविषयी विपुल लेखन केले असून मराठी विश्वकोश, मराठी ग्रंथकोश आदी महत्त्वाच्या कार्यात त्यांचे योगदान आहे. तसेच नाटक, कथासंग्रह, वैचारिक, ललित लेखन, समीक्षात्मक अशा विविध प्रकारची साहित्य निर्मिती त्यांनी केली आहे. त्यामुळे संमेलनाध्यक्ष पदासाठी त्यांची निवड करण्यात आली आहे. यापूर्वी कविवर्य नारायण सुर्वे, बाबूराव बागुल, डॉ. आनंद यादव, डॉ. सदा कऱ्हाडे, अरुण साधू, उत्तम तुपे, शिवाजी सावंत, नामदेव ढसाळ, डॉ. विठ्ठल वाघ, मधु मंगेश कर्णिक, प्रा. केशव मेश्राम, डॉ. अनिल अवचट, उत्तम कांबळे, फ. मु. शिंदे, डॉ. रुपा कुलकर्णी, रामदास फुटाणे यांनी कामगार साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषवले आहे.

मराठी अस्मितेचा बुलंद आवाज. https://epapervrittamanas. in/

# वृत्तमानस

मुंबई/ पालघर | शनिवार, ११ फेब्रुवारी २०२३ | वर्ष- २६ | अंक-२३२ | पाने- ८

## 7 वे राज्यस्तरीय कामगार साहित्य संमेलन मिरजेत

# संमेलनाध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिका डॉ.तारा भवाळकर, उद्घाटक डॉ.राजा दीक्षित

■ **मुंबई**

१७ व्या राज्यस्तरीय कामगार साहित्य संमेलनाचे दि.२४ व २५ फेब्रुवारी २०२३ रोजी मिरज, जि.सांगली येथे आयोजन करण्यात आले असून संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिका डॉ.तारा भवाळकर यांची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती कामगार मंत्री तथा संमेलनाचे स्वागताध्यक्ष ना.डॉ.सुरेश (भाऊ) खाडे यांनी दिली. मंत्रालय मुंबई येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, डॉ.भवाळकर यांनी लोकसंस्कृतीविषयी विपूल लेखन केले असून मराठी विश्वकोश, मराठी ग्रंथकोश आदी महत्वाच्या कार्यात त्यांचे योगदान आहे. तसेच नाटक, कथासंग्रह, वैचारिक, ललित लेखन, समीक्षात्मक अशा विविध प्रकारची साहित्य निर्मिती त्यांनी केली आहे. त्यामुळे संमेलनाध्यक्ष पदासाठी त्यांची निवड करण्यात आली आहे.

महाराष्ट्र विश्वकोष निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ.राजा दीक्षित या संमेलनाचे उद्धाटक असून कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनीता वेद सिंगल मार्गदर्शक तर महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे कल्याण आयुक्त रविराज इळवे संमेलनाचे प्रमुख कार्यवाह आहेत. बालगंधर्व नाट्य मंदिर, मिरज, जि.सांगली येथे संमेलन होणार आहे. शुक्रवार, दि.२४ फेब्रुवारी रोजी सकाळी ग्रंथदिंडी काढण्यात येईल. सकाळी १० वाजता संमेलनाचा उद्घाटन सोहळा होईल.

संमेलनाच्या पहिल्या सत्रात चला उद्योजक होऊ या विषयावर डॉ.विठ्ठल कामत (कामत हॉटेल्स ग्रुप लि.), गिरीश चितळे (चितळे उद्योग समुह), हनुमंतराव गायकवाड (भारत विकास ग्रुप इंडिया लि.) या उद्योजकांची प्रकट मुलाखत होणार आहे. दोन दिवस चालणाऱ्या या संमेलनात कामगार चळवळीची कथा आणि व्यथा, मराठी साहित्यात कामगार जिवनाचे चित्र शोधताना, आम्ही का लिहितो?, व्यसनमुक्तीची लढाई या विषयांवर परिसंवादांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचबरोबर कवींचे कवी संमेलन आणि काव्य मैफिलीचा रसिक प्रक्षेकांना आस्वाद घेता येणार आहे. निमंत्रित तसेच कामगार कवींचा कवी संमेलनात सहभाग असेल. संमेलनात कथाकथनाचे सादरीकरण होणार असून अभिरुप न्यायालय देखील भरवले जाणार आहे.

आदर्श गाव हिवरे बाजारचे सरपंच पद्मश्री पोपटराव पवार अभिरुप न्यायालयात आरोपीच्या पिंजऱ्यात असतील. संमेलनासाठी इच्छुक कामगारांची नोंदणी करण्यात येत असून अधिक माहितासाठी महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या www. public.mlwb.in या संकेतस्थळास अथवा नजीकच्या कामगार कल्याण केंद्रास व कार्यलयास भेट द्यावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

### मान्यवर साहित्यिकांनी भूषवले आहे संमेलनाचे अध्यक्षपद

*यापुर्वी कविवर्य नारायण सुर्वे, बाबूराव बागुल, डॉ.आनंद यादव, डॉ.सदा कऱ्हाडे, अरुण साधू, उत्तम तुपे, शिवाजी सावंत, नामदेव ढसाळ, डॉ.विठ्ठल वाघ, मधु मंगेश कर्णिक, प्रा.केशव मेश्राम, डॉ.अनिल अवचट, उत्तम कांबळे, फ.मु.शिंदे, डॉ.रुपा कुलकर्णी, रामदास फुटाणे यांनी कामगार साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविले आहे.कामगार क्षेत्रात काम करताकरता वाचकांची साहित्य अभिरुची आणि वास्तव जीवनाचे प्रत्यक्ष चित्रण आपल्या लेखनात करणारे नामवंत साहित्यिक,कवी या संमेलनाला अध्यक्ष म्हणून लाभले आहे.*

# १७ वे राज्यस्तरीय कामगार साहित्य संमेलन मिरजेत

मुंबई - १७ व्या राज्यस्तरीय कामगार साहित्य संमेलनाचे २४ व २५ फेब्रुवारी २०२३ रोजी मिरज, जि.सांगली येथे आयोजन करण्यात आले असून, संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिका डॉ. तारा भवाळकर यांची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती कामगार मंत्री तथा संमेलनाचे स्वागताध्यक्ष डॉ.सुरेश (भाऊ) खाडे यांनी दिली. मंत्रालय मुंबई येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, डॉ.भवाळकर यांनी लोकसंस्कृतीविषयी विपूल लेखन केले असून मराठी विश्वकोश, मराठी ग्रंथकोश आदी महत्त्वाच्या कार्यात त्यांचे योगदान आहे. तसेच नाटक, कथासंग्रह, वैचारिक, ललित लेखन, समीक्षात्मक अशा विविध प्रकारची साहित्य निर्मिती त्यांनी केली आहे. त्यामुळे संमेलनाध्यक्षपदासाठी त्यांची निवड करण्यात आली आहे.

महाराष्ट्र विश्वकोष निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ.राजा दीक्षित या संमेलनाचे उद्‌घाटक असून, कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनीता वेद सिंगल मार्गदर्शक, तर महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे कल्याण आयुक्त रवीराज इळवे संमेलनाचे प्रमुख कार्यवाह आहेत. बालगंधर्व नाट्य मंदिर, मिरज, जि. सांगली येथे संमेलन होणार आहे. शुक्रवार, २४ फेब्रुवारी रोजी सकाळी ग्रंथदिंडी काढण्यात येईल. सकाळी १० वाजता संमेलनाचा उद्‌घाटन सोहळा होईल.

MumbaiChoufer Edition
Feb 11, 2023 Page No. 3
Powered by : eReleGo.com

नवराष्ट्र

## उद्घाटक राजा दिक्षीत ● संमेलनाध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिका डॉ. तारा भवाळकर

# १७वे कामगार साहित्य संमेलन मिरजेत

मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. १७ व्या राज्यस्तरीय कामगार साहित्य संमेलनाचे. २४ व २५ फेब्रुवारी २०२३ रोजी मिरज, जि. सांगली येथे आयोजन करण्यात आले असून संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिका डॉ. तारा भवाळकर यांची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती कामगार मंत्री तथा संमेलनाचे स्वागताध्यक्ष डॉ. सुरेश (भाऊ) खाडे यांनी दिली. मंत्रालय मुंबई येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, डॉ. भवाळकर यांनी लोकसंस्कृतीविषयी विपूल लेखन केले असून मराठी विश्वकोश, मराठी ग्रंथकोश आदी महत्वाच्या कार्यात त्यांचे योगदान आहे. नाटक, कथासंग्रह, वैचारिक, ललित लेखन, समीक्षात्मक अशा विविध प्रकारची साहित्य निर्मिती त्यांनी केली आहे. त्यामुळे संमेलनाध्यक्ष पदासाठी त्यांची निवड करण्यात आली आहे. या कामगार साहित्य संमेलनाच्या माध्यमातून कष्टकरी, श्रमिकांच्या साहित्यावर प्रकाशझोत टाकणारे व्यासपिठ यानिमित्ताने उपलब्ध होणार आहे.



## 'व्यसनमुक्तीची लढाई' या विषयांवर परिसंवाद

दोन दिवस चालणाऱ्या या संमेलनात कामगार चळवळीची कथा आणि व्यथा, मराठी साहित्यात कामगार जिवनाचे चित्र शोधताना, आम्ही का लिहितो ?, व्यसनमुक्तीची लढाई या विषयांवर परिसंवादांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचबरोबर कवींचे कवी संमेलन आणि काव्य मैफिलीचा रसिक प्रक्षेकांना आस्वाद घेता येणार आहे. निमंत्रित तसेच कामगार कवींचा कवी संमेलनात सहभाग असेल. संमेलनात कथाकथनाचे सादरीकरण होणार असून अभिरुप न्यायालय भरवले जाणार आहे. आदर्श गाव हिवरे बाजारचे सरपंच पद्मश्री पोपटराव पवार अभिरुप न्यायालयात आरोपीच्या पिंजऱ्यात असतील.

## संमेलनासाठी इच्छूक कामगारांची नोंदणी

संमेलनासाठी इच्छुक कामगारांची नोंदणी करण्यात येत असून अधिक माहितासाठी महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या www.public.mlwb.in या संकेतस्थळास अथवा नजीकच्या कामगार कल्याण केंद्रास व कार्यलयास भेट द्यावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले. यापूर्वी कविवर्य नारायण सुर्वे, बाबूराव बागुल, डॉ. आनंद यादव, डॉ. सदा कऱ्हाडे, अरुण साधू, उत्तम तुपे, शिवाजी सावंत, नामदेव ढसाळ, डॉ. विठ्ठल वाघ, मधु मंगेश कर्णिक, प्रा. केशव मेश्राम, डॉ. अनिल अवचट, उत्तम कांबळे, फ. मु. शिंदे, डॉ. रुपा कुलकर्णी, रामदास फुटाणे यांनी कामगार साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविले आहे.

## संमेलनात उद्योजकांची प्रकट मुलाखत

महाराष्ट्र विश्वकोष निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ. राजा दीक्षित या संमेलनाचे उद्घाटक असून कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनीता वेद सिंगल मार्गदर्शक तर महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे कल्याण आयुक्त रविराज इळवे संमेलनाचे प्रमुख कार्यवाह आहेत. बालगंधर्व नाट्य मंदिर, मिरज, जि. सांगली येथे संमेलन होणार आहे. २४ फेब्रुवारी रोजी सकाळी ग्रंथदिंडी काढण्यात येईल. सकाळी १० वाजता संमेलनाचा उद्घाटन सोहळा होईल. संमेलनाच्या पहिल्या सत्रात 'चला उद्योजक होऊ' या विषयावर डॉ. विठ्ठल कामत (कामत हॉटेल्स गृप लि.), गिरीश चितळे (चितळे उद्योग समुह), हनुमंतराव गायकवाड (भारत विकास गृप इंडिया लि.) या उद्योजकांची प्रकट मुलाखत होणार आहे.

Mumbai Edition
11 February 2023 Page No. 6
epaper.navarashtra.com



दैनिक
# चालु वार्ता

नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...
दारू...अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
(महाराष्ट्राचे पसंतीदार नशामुक्ती सेंटर)
डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र

# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे केंद्र देगलूरच्या वतीने सहलीचे आयोजन

***दै.चालु वार्ता, देगलूर, प्रतिनिधी,***
***◀संतोष मंनधरणे▶***

**देगलूर :** दिनांक २६ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे वतीने गट कार्यालय नांदेड अंतर्गत कामगार कल्याण केंद्र देगलूर यांच्यामार्फत इमारत बांधकाम कामगार व बांधकाम कामगार कुटुंबीयाची लांब पल्ल्याची सहल श्री क्षेत्र नरसिंह देवस्थान बिदर कर्नाटक राज्य येथे देगलूर सकाळी आठ वाजता रवाना झाली बांधकाम कामगार उपस्थित होते अशोक शेरे सुभाष डोंगरे गंगाधर मैलारे बाबू मामा पिंटेवाड योगेश गंधलवार राजकुमार दयानंद बिरादार दयानंद मठपती व अनेक बांधकाम कामगार उपस्थित होते तसेच ही सहल नांदेड गटा चे कामगार कल्याण अधिकारी प्रसाद धस यांच्या मार्गदर्शन खाली घेण्यात आले यावेळी केंद्राचे कर्मचारी उषा बिरादार व महानंदा मैलागीरे व व्ही बी स्वामी हे परिश्रम घेतले.






मे. रुद्राप्पाआण्णा शंकरशेठ
खेराडकर सराफ
सोने | चांदी | हिरे | रत्ने
तासगाव पलूस सांगली
346-240607, 346-240434 02346-229454 0233-2303177

दक्षिण महाराष्ट्र केसरी
वर्ष : ३६ • अंक २३५ • RNI NO. 49899/90 • रविवार, २६ फेब्रुवारी २०२३ • पाने : ८ + ४ रविवार पुरवणी, पाच रुपये • सांगली-कोल्हापूर

## कुत्र्याच्या हल्ल्यात महिलेचा मृत्यू

केसरी वृत्तसेवा

इचलकरंजी : येथील नागुबाई अर्जुन कांबळे (वय ७२ वर्षे, गांधी गल्ली, इचल-करंजी) ही महिला पहाटे ... कुत्र्यांनी केलेल्या ... गंभीर जखमी झाली ... त्यांना उपचारासाठी ... इंदिरा गांधी सामान्य ... पहाटे ५ वाजता ... केले. त्यांना आवश्यक ... इंजेक्शन देऊन वॉर्डमध्ये ... आले. त्यांच्यावर ... सुरू असताना त्यांची ... चिंताजनक होती. ... उपचारादरम्यान मृत्यू ... असून त्यांच्या मृत्यूचे ... समजण्यासाठी ... करण्यात येणार ... डॉ. दिलीप वाडकर ...



...बाई कांबळे

# प्रत्येक जिल्ह्यामध्ये कामगार भवन उभारणार

## पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे; कामगार साहित्य संमेलनाचा समारोप

केसरी वृत्तसेवा

मिरज : कामगारांच्या व्यथा, अडचणी, त्यांची सुख: दुख: ही मी स्वत: भोगलेली असून यातून कामगारांच्यासाठी काही तरी मार्ग निघावा यासाठी प्रत्येक जिल्ह्याला कामगार भवन उभे करून एकाच छताखाली कामगारांच्या सर्व अडीअडचणी सोडविण्यासाठी प्रयत्नशील आहे, असे प्रतिपादन कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांनी केले.

१७ व्या कामगार साहित्य संमेलनाचा सांगता समारंभ

(पुढील मजकूर पान ६ वर)



मिरज येथे १७ व्या कामगार साहित्य संमेलनाच्या सांगता समारंभात बोलताना पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे. यावेळी ज्येष्ठ साहित्यिका डॉ. तारा भवाळकर, प्रेमानंद गज्वी आदि मान्यवर.

# बारावी परीक्षा देण्यासाठी जाणारा विद्यार्थी एसटीखाली सापडून ठार

## संतप्त जमावाची एसटीवर दगडफेक

केसरी वृत्तसेवा

मिरज : मिरजेतील दत्त चौकात बारावी परीक्षा देण्यासाठी जाणारा शाफीन समीर पिरजादे, (वय १७, रा. सुभाषनगर, मिरज) या महाविद्यालयीन विद्यार्थ्याचा एसटीच्या चाकाखाली सापडून जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर संतप्तजमावानेएस.टी.वरदगडफेक करुन काचा फोडल्या. याप्रकरणी एस.टी. चालकास पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

शाफिन पिरजादे हा शनिवारी सकाळी १० वाजता आर्षद नरवाडे व सिद्दिक जाफर यांच्यासोबत बारावी परीक्षा देण्यासाठी मिरज मार्केटकडे चालत जात असताना दत्त चौकात गर्दीत पाठीमागून येणाऱ्या मिरज - डोंगरवाडी (क्रमांक एम. एच.- ४० वाय ५०६६) या एस.टी.च्या मागील चाकाखालीशाफिनसापडला. चाक अंगावरुन गेल्याने गंभीर जखमी झालेल्या शाफिन यास सिव्हिल रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. तेथे डॉक्टरांनी त्यास मृत घोषित केले.

दत्तचौकपरिसरातरस्त्यावरील विक्रेते व अतिक्रमणामुळे रस्ता अरुंद आहे. येथे नेहमीच वाहतूक कोंडी होते. याकडे महापालिका प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे शाफिन याचा बळी गेल्याने नागरिकांत संतप्त प्रतिक्रिया होती. अपघातप्रकरणी शहर पोलिसांनी एस.टी. चालक ए. एस. खराडे यास ताब्यात घेतले. अपघातानंतर जमावाने पोलिस ठाण्यासमोर एस.टी. वर दगडफेक करुन काचा फोडल्या. रस्त्यावरील अतिक्रमणे व वाहतूक कोंडीमुळे शाफिन याच्या दुर्दैवी मृत्यूबाबत हळहळ व्यक्त होत होती.



मिरजेतील दत्त चौकात झालेल्या अपघातानंतर संतप्त जमावाने एस.टी. थांबवून दगडफेक केली.

## राज्य विधिमंडळाचे अंदाजपत्रकी अधिवेशन उद्यापासून

## पिनॉमिकच्या तिघांच्या पोलिस कोठडीत वाढ

केसरी वृत्तसेवा

## अजित पवारांना बारामतीच्या बाहेर कितपत राजकारण कळत?

# प्रत्येक जिल्ह्यामध्ये कामगार भवन उभारणार

(पान १ वरून)

बालगंधर्व नाट्यमंदिर मिरज येथे संपन्न झाला. या प्रसंगी पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे बोलत होते. यावेळी संमेलनाध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिका डॉ. तारा भवाळकर, ९९ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ नाटककार प्रेमानंद गज्वी, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे कल्याण आयुक्त रविराज इळवे, सहायक कामगार आयुक्त अनिल गुरव, माजी महापौर संगीता खोत यांच्यासह मान्यवर पदाधिकारी, साहित्यिक व कामगार उपस्थित होते.

पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे म्हणाले, कामगार कष्टाचे काम करत असतो त्यामुळे त्याच्या आरोग्याच्या अडचणी निर्माण होतात. कामगारांना योग्य उपचार मिळावेत यासाठी प्रत्येक जिल्ह्याला मल्टीपर्पज ईएसआय हॉस्पीटलसाठी प्रयत्न करीत असून ६ ईएसआय हॉस्पीटल मंजूर करण्यात आली आहेत. त्यापैकी पुणे येथील मल्टीपर्पज हॉस्पीटलची पायाभरणी लवकरच करण्यात येईल. कामगारांची मुले खेळ, उद्योगात आली पाहिजेत यासाठी प्रत्येक जिल्ह्यात त्यांना योग्य प्रशिक्षण देण्यासाठी वास्तु उभा करण्यासाठी प्रयत्न करीत आहोत. ईएसआय हॉस्पीटलला जोडूनच कामगारांच्या मुलांसाठी मेडिकल कॉलेज काढण्यासाठी प्रयत्न करीत आहोत. कामगारांच्या मुलांना टेक्नीकल प्रशिक्षण देण्यासाठीही प्रयत्न सुरू असल्याचे सांगून प्रत्येक वर्षी कामगार साहित्य संमेलन [illegible] यावेळी व्यक्त केला.

डॉ. तारा भवाळकर यांनी साहित्य संमेलन अत्यंत आनंदात पार पडल्याबद्दल सर्वांना धन्यवाद भवाळकर म्हणाल्या, वर्षभर कवि संमेलन, कथाकथन, परिसंवाद अशा प्रकारचे कार्यक्रम विविध ठिकाणी घ्यावेत त्यामुळे त्या त्या ठिकाणच्या कलाकारांना वाव मिळेल. कामगार ज्या ज्या ठिकाणी काम करतात त्या त्या ठिकाणी त्यांना चांगली स्वच्छतागृहे, स्वच्छ पाणी, खाण्यापिण्याची व्यवस्था अशा सुविधा त्यांना परवडतील अशा पध्दतीने उपलब्ध व्हाव्यात अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

ज्येष्ठ नाटककार प्रेमानंद गज्वी म्हणाले, कामगार साहित्य चळवळीची अत्यंत आवश्यकता आहे. अनुवादक फळी निर्माण करून आपल्या भाषेतील साहित्य इतर ठिकाणी पोहचविणे आवश्यक असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

या कार्यक्रम प्रसंगी वैचारिक लेखन, नाट्यलेखन, काव्यलेखन, कथालेखन स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. तसेच विविध लेखकांनी लिहिलेल्या पुस्तकाचे प्रकाशनही यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

प्रास्ताविकात महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे कल्याण आयुक्त रविराज इळवे यांनी साहित्य संमेलनाबद्दल सविस्तर माहिती देवून हे संमेलन यशस्वी करण्यासाठी सहकार्य केलेल्या सर्वांचे आभार मानले. सूत्रसंचालन श्वेता हुले यांनी केले. आभार सहायक कल्याण आयुक्त माधवी सुरवे यांनी मानले. या कार्यक्रमास साहित्यप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

(पान १ वरून)

## त्रिपुरासाठी ६० निरीक्षकांची नियुक्ती

पोटनिवडणूक होत आहे. या सर्वांचा निकाल २ मार्च रोजी मतमोजणीनंतर जाहीर होईल. त्रिपुरात विधानसभेच्या ६० जागा आहेत. या सर्व मतदारसंघात २८ फेब्रुवारी रोजीच मतमोजणी निरीक्षक दाखल होतील, असे त्रिपुराचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. बंदोपाध्याय यांनी सांगितले. निवडणूक अधिकाऱ्यांनी आठही जिल्ह्यांचा दौरा केला आहे. तसेच, जिल्हा दंडाधिकारी आणि पोलिस अधीक्षकांची भेट घेतली.

## राज्य विधिमंडळाचे अंदाजपत्रकी अधिवेशन उद्यापासून

निर्माण होणार आहेत. कारण विधानसभेत सत्ताधारी-विरोधक, तसेच त्यामधील पक्षांनुसार आमदारांच्या बसण्याची जागा निश्चित होत असते. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आपल्यासाठी विधिमंडळात शिवसेना हा एकच पक्ष आहे, असे स्पष्ट केले आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे शिवसेनेला अद्याप तरी वेगळा गट अशी विधिमंडळात मान्यता मिळालेली नाही.

## [illegible] तिघांच्या पोलिस कोठडीत वाढ

पोलिस कोठडी वाढविण्यात आली. पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतविण्यास सांगून गुंतवणूकदारांकडून पैसे घेत त्यांचा मोबदला न दिल्याने संशयितांवर गुन्हा दाखल करण्यात

मुंबई, शनिवार, २५ फेब्रुवारी २०२३ लो WWW.LOKSATTA.COM

लोकसत्ता

मुंबई, पुणे, नागपूर, अहमदनगर, औरंगाबाद आणि दिल्ली येथून प्रसिद्ध

लोकमान्य, लोकशक्ती!

# 'नव्या युगात माणूस यंत्रशरण'

## कामगार साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष डॉ. तारा भवाळकर यांचे मत



कामगार साहित्य संमेलनात अध्यक्ष पदावरून बोलत असताना लोकसाहित्याच्या अभ्यासिका डॉ. तारा भवाळकर व अन्य मान्यवर.

लोकसत्ता प्रतिनिधी

सांगली : नव्या युगात माणूस यंत्रशरण होत आहे. यंत्र आपल्या हातातच हवे, डोक्यात जाता कामा नये. जर यंत्राने मानवावर अतिक्रमण केले तर मानव मानवच उरणार नाही असे मत लोकसाहित्याच्या अभ्यासिका डॉ. तारा भवाळकर यांनी व्यक्त केले.

मिरजेतील बालगंधर्व नाट्यगृहात अण्णा भाऊ साठे नगरीत भरलेल्या सतराव्या कामगार साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून श्रीमती डॉ. भवाळकर बोलत होत्या. या संमेलनाचे उद्‌घाटन विश्वकोष निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ. राजा दीक्षित यांच्या हस्ते करण्यात आले. स्वागताध्यक्ष राज्याचे कामगार व जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे होते, तर महापौर दिग्विजय सूर्यवंशी, नाटककार प्रेमानंद गज्वी, प्रधान सचिव विनीता वेद सिंगल, कल्याण आयुक्त रविराज इळवे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना श्रीमती डॉ. भवाळकर म्हणाल्या,, परंपरेतील श्रमसंस्कृतीचा आढावा घेत असताना पारंपरिक ओव्यांची जोड देत महिलांना यंत्रयुगामुळेच श्रममुक्ती मिळाल्याचे सांगितले. कामगार चळवळीतून आलेल्या कामगार साहित्यिकांनी कामगारांना हक्कांची जाणीव करून देत असताना प्रतिष्ठा, स्वाभिमानाचीही जाणीव करून दिली. यातूनच आजची महानगरे ही यंत्रयुगाचीच देण बनली आहेत.

यंत्रामुळे कितीही प्रगती साधली तरी यंत्र बनविणारे हात हे मानवीच असून सजृनता यामध्ये आहे. यंत्रआहारी गेला तर मानव आपली श्रमसंस्कृती विसरण्याचा धोका आहे. कृत्रिम बुध्दिमत्तेच्या जोरावर सुखसुविधा उपलब्ध होऊ शकतात. मात्र, जगण्यातील कलात्मकता ही केवळ सृजनातूनच मिळू शकते. यामुळे माणूस म्हणून टिकून राहण्यासाठी कलात्मकताही जोपासण्याची गरज आहे. भाकरी जशी जगण्यासाठी आवश्यक आहे तसेच सौंदर्य हे कसे जगायचे हेच शिकवते.

यावेळी उद्‌घाटक म्हणून बोलताना डॉ. दीक्षित म्हणाले, बुध्दी आणि श्रम हे एकत्र नांदत असतील तरच माणूस घडत असतो. श्रमातून सौंदर्य आणि संपत्ती निर्माण होते. साठोत्तर काळातच कामगार चळवळीतून जन्माला आलेल्या साहित्यातून साहित्याचे दलित, कामगार साहित्य निर्माण झाले. आज चळवळी मंदावल्याचे चित्र दिसत आहे. जागतिकीकरणाचे दुष्परिणाम या चळवळीवर झाले असून यातून कंत्राटी कामगार पध्दती रूढ होऊ लागली आहे. साहित्यातील संवेदनशीलताच यामध्ये स्थैर्य निर्माण करू शकते.

यावेळी स्वागताध्यक्ष या नात्याने बोलताना पालकमंत्री खाडे यांनी संमेलन आयोजनामागील हेतू विषद केला तर, कल्याण आयुक्त इळवे यांनी प्रास्ताविक केले. संमेलनापूर्वी छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापासून ग्रंथ दिंडी काढण्यात आली. यामध्ये शाळकरी मुलासह शहरातील डॉ. विनोद परमशेट्टी, डॉ. दयानंद नाईक, दक्षिण महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्रा. भीमराव धुळुबुळे, डॉ. विकास पाटील आदी सहभागी झाले होते. दोन दिवसाच्या साहित्य संमेलनामध्ये विविध चर्चासत्रे, कविसंमेलने यांचे आयोजन करण्यात आले आहे.

# व्यसनमुक्तीसाठीची लढाई सातत्यपूर्ण, अखंड चालणारी

## मिरजेत सतराव्या कामगार साहित्य संमेलनात पहिल्या दिवशीच्या परिसंवादात वक्त्यांचा सूर

मिरज, ता. २६ : व्यसनमुक्तीचे काम हे दगडावर कार्य करण्यासारखे आहे. यात निराश होऊन चालत नाही. व्यसन हा आजार आहे. रुग्णाला बरे होईपर्यंत मदत करणे, हाच प्रयत्न आहे. ही जगवण्याची लढाई आहे. निराशा खूप व यशाचे प्रमाण कमी असते. व्यसनमुक्तीची लढाई अखंड चालणारी आहे, असा सूर व्यसनमुक्तीची लढाई या परिसंवादात व्यक्त झाला.



**मिरज : व्यसनमुक्तीची लढाई परिसंवादात सहभागी मुक्ता पुणतांबेकर, मधुकर गीते, तुषार नातू, बाळासाहेब बाणखेले.**

येथे बालगंधर्व नाट्यमंदिरात लोकशाहीर अण्णा भाऊ साठे साहित्यनगरीत आजपासून कामगार साहित्य संमेलन सुरू झाले. पहिल्या दिवशी हा परिसंवाद झाला. मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्राच्या संचालिका मुक्ता पुणतांबेकर अध्यक्षस्थानी होत्या. नागपूरच्या मैत्रेयी व्यसनमुक्ती केंद्राचे समुपदेशक तुषार नातू, नवोदय व्यसनमुक्ती केंद्राचे संचालक (मेंढी, ता. सिन्नर, जि. नाशिक) मधुकर गीते आणि मंचर येथील राज्य व्यसनमुक्ती पुरस्कार प्राप्त बाळासाहेब बाणखेले यांनी सहभाग घेतला. मिलिंद कुलकर्णी या परिसंवादाचे सूत्रधार होते.

पुणतांबेकर म्हणाल्या, "व्यसनांचा आजार उपचारांनी बरा होऊ शकतो. लहान मुले व महिलांत व्यसनांचे प्रमाण वाढत आहे. आम्ही महिलांसाठी निशिगंध हे व्यसनमुक्ती केंद्र सुरू केले आहे. व्यसनांमुळे गरीब, श्रीमंत अशा सर्वांचेच आर्थिक, कौटुंबिक नुकसानही होते." तुषार नातू यांनी स्वतःचा व्यसनाधिनतेचा प्रवास आणि त्यातून बाहेर पडून आज नागपूरच्या मैत्रेयी व्यसनमुक्ती केंद्राचे समुपदेशक म्हणून करत असलेले काम याची माहिती दिली.

ते म्हणाले, "उच्चभ्रू वर्गात व्यसन लपवण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे या वर्गातील रुग्ण उपचाराला वेळ लावतात, तर गरीब उपचाराला लवकर येतात. व्यसनाधिनता हा आजार आहे. अशा रुग्णाला लवकर उपचाराला प्रवृत्त करावे, तरच ही चळवळ लोकांपर्यंत पोहोचेल."

मधुकर गीते म्हणाले, "कामगार क्षेत्रात व्यसनांचा धुमाकूळ पाहिला. व्यसनातून झालेले मनोरुग्ण पाहिले. त्यांना स्कीझोफ्रेनिया होतो. व्यसनमुक्तीचे काम हे दगडावर कार्य करण्यासारखे आहे. ही जगवण्याची लढाई आहे. जगवण्यात वेगळीच मजा असते."

बाळासाहेब बाणखेले म्हणाले, "कुटुंब व्यवस्था बळकट असली की व्यसन येत नाही. व्यसनातून अपघात होणाऱ्या कामगारांना आम्ही मदत केली. व्यसनामुळे अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झालेली पाहिली. त्यामुळे व्यसनमुक्तीसाठी प्रबोधन करण्याची गरज आहे. शासनाने व्यसनाधिनता का होते, याचा शोध घेऊन त्याचे उच्चाटन केले पाहिजे."

### 'स्क्रीन'चे व्यसन लहानांपासून मोठ्यांपर्यंत

■ श्रीमती पुणतांबेकर म्हणाल्या, "हल्ली 'स्क्रीन'चे व्यसनही लहानांपासून मोठ्यांपर्यंत मोठ्या प्रमाणात वाढत आहे. फोन, टीव्ही, संगणक खेळ सतत खेळणे हे व्यसनच आहे. अमेरिका, चीन, कोरियात यासाठी व्यसनमुक्ती केंद्र सुरू झाले आहे."

# कामगारांचा केवलानंद

**१७ वे कामगार साहित्य संमेलन मिरज येथे उत्साहात आणि आनंदात पार पडले. संमेलनाला मिळालेला प्रतिसाद जरी नजरेत भरावा असा नसला तरी नामदार डॉ. सुरेश खाडे यांच्या पुढाकाराने हे संमेलन घडून आले. हे निश्चितच महत्वाचे आहे. याचे कारण असे की, या पूर्वी जोमात होणारे कामगार संमेलन काहीसे खंडीत झालेले होते.**



कामगार मंत्र्यांनी त्याला नव्याने संजिवनी प्राप्त करून दिले आहे. भविष्यात हे संमेलन आणखीन व्यापक पद्धतीने होत राहील, असे या संमेलनावरून निश्चितपणे वाटते. पूर्वी कामगार हे सर्वार्थाने कष्टकरीच होते. त्यामुळे त्यांना कलानंदासाठी अवसर मिळतच नसे. अण्णाभाऊ साठे, नारायण सुर्वे ही नावे आज जरी आपण मोठ्या दिमाखात घेत असलो तरी मराठीतील साठीपर्यंतच्या साहित्यात मात्र या थोर सारस्वतांची फारशी दखल घेतली गेल्याचे दिसत नाही. याला तत्कालीन परिस्थितीही कारणीभूत असावी असा निष्कर्ष आज काढता येईल.

या अर्थाने संमेलनाच्या प्रमुख अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर यांनी जे उद्‌गार काढलेले आहेत ते निश्चितच भविष्याकरिता कामगारांना आणि समाजाला दिशा दर्शक आहेत. त्या असे म्हणाल्या की, आज माणूस यंत्र शरण होत चालला असल्याने श्रम आणि बुद्धी याचे संतुलन भविष्यात कसे राहील, याची चिंता वाटते आहे.

विश्वकोषाचे अध्यक्ष राजा दिक्षित असे म्हणाले की, मनगट आणि मन याच्याच संयोगातून कला निर्मिती होत असते, पण या करिता कामगारांना फुरसत कितपत मिळते, हा यातील खरा कळीचा प्रश्न आहे. त्याशिवाय कामगारांचे हात लिहिते कसे होणार त्याकरिता वाढत चाललेले खासगीकरण ही पण चिंतेची बाब वाटू लागली आहे. कामगारांनी झटून लिहावे कला स्वाद घ्यावा, याकरिता तसे कामगाराभिमुख पर्यावरण तयार करण्याची जबाबदारी शासन आणि समाजाची पण आहे.

त्याशिवाय कामगार मनोभावे साहित्याकडे कितपत वळेल असे पण वाटते आहे. नारायण सुर्वे यांनी कामगार आहे, तळपती तलवार आहे. सारस्वतांनो थोडासा गुन्हा करणार आहे असे म्हणत कवितेच्या प्रांगणात प्रवेश केला आणि कामगार विश्वाचे आपले विद्यापीठ निर्माण केले. असे जरी असले तरी अण्णा भाऊ साठे, नारायण सुर्वे यांना या नवनिर्माण कार्याकरिता कसा अवसर मिळाला असेल याचे आता नव्याने चिंतन होऊ लागले आहे. ते निश्चितच स्वागतार्ह आहे. हे सारे चर्चेत येत आहे. त्याचे कारण म्हणजे मिरज येथे पार पडलेले हे कामगार साहित्य संमेलन आहे. सांगली जिल्ह्यात कामगारांना येथोचित सवलती मिळवून देण्यातही सतत प्रयत्न झालेले आहेत. नागनाथअण्णा नायकवडी, जी. डी. बापू लाड, माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील, सहकारातील धुरीण गुलाबराव पाटील अशा मंडळींनी कामगारांच्या करिता मोलाचे काम करून ठेवलेले आहे. आता प्रश्न आहे तो कामगारांचा खरा आनंद त्यांना पुन्हा मिळवून देण्याचा आहे.

त्याकरिता कामगार वस्तीत वाचनालये, ग्रंथालये सुरू करण्याचे शासकीय स्तरावरून प्रयत्न व्हायला हवेत. सांप्रतचे कामगार मंत्री नामदार डॉ. सुरेश खाडे या करिता प्रयत्नशील आहेत. हे निश्चितच महत्वाचे आहे. या संमेलनाचे फलित म्हणचे कामगार जगताची चर्चा पुन्हा नव्याने समाजाच्या भूपृष्ठावर आली, आणि त्यातून उद्याचा समाज कामगारांचे आनंद विश्व नव्याने शोधू लागेल, असे वाटते.

भाऊ पाध्ये यांच्या वैतागवाडी, करंटा या सारख्या कामगार जीवनावरील कादंबऱ्या आता नव्याने चर्चेत येण्यास हरकत नाही. असे झाले तर पृथ्वी ही शेषाच्या मस्तकावर तरलेली नसून कामगार आणि शेतकरी यांच्या तळ हातावर तरलेली आहे. याचा साक्षात प्रत्यय मराठी समाजाला येईल, असे वाटते.

या करिता केवळ कामगारांना एकत्र करून भागणार नाही. तर त्याकरिता त्यांची म्हणून व्यासपीठे तयार करावी लागतील. चर्चा मंडळे निर्माण करावी लागतील, आणि अशा अर्थपूर्ण एकत्र येण्यातूनच उद्याचे कामगार विश्व संपन्न होईल, असा विश्वास या संमेलनाच्या निमित्ताने व्यक्त करावासा वाटतो. हे सारे घडवून आणणारे मराठी कामगार कल्याण मंडळ आणि कामगारमंत्री प्रशंसनीय कामगिरीने अभिनंदनास पात्र होतात, त्याबद्दल संबंधित सर्वांनाच धन्यवाद !

**– प्रा. वैजनाथ महाजन**

मिळवावे, अशी अपेक्षा पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांनी

आले. स्पर्धा उद्घाटन सोहळाप्रसंगी जिल्हा क्रीडा अधिकारी माणिक वाघमारे

शासनाच्यावतीने या फुटबॉल स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. जिल्हा, विभाग व

शुभेच्छा दिल्या. या फुटबॉल स्पर्धेत जिल्ह्यातील १७ संघ सहभागी झाले आहेत.

माधवी चव्हाण प्रीमियर हॉस्पिटल कोल्हापूर, डॉ राजेंद्र माने ओरायझन मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल सांगली

जाधव, अभिजित जाधव, राकेश काळे, बाळासाहेब घेवदे यांच्यासह इतर मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दै. बंधुता

# राज्यस्तरीय कामगार साहित्य संमेलनाचे २४ व २५ फेब्रुवारी रोजी मिरज येथे आयोजन

**मुंबई/बंधुता वृत्तसेवा**

सतरावे राज्यस्तरीय कामगार साहित्य संमेलन दि.२४ व २५ फेब्रुवारी २०२३ रोजी मिरज, जि. सांगली येथे होणार आहे. या संमेलनात सर्व कामगारांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होण्याचे आवाहन कामगार मंत्री डॉ. सुरेश खाडे यांनी आज मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेत या संमेलनाबाबत माहिती देताना केले.

बालगंधर्व नाट्य मंदिर, मिरज, जि.सांगली येथे हे संमेलन होणार असून शुक्रवार, दि. २४ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता संमेलनाचे उद्घाटन होणार आहे.

या दोन दिवसीय संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. तारा भवाळकर यांची निवड करण्यात आली असून महाराष्ट्र विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ. राजा दीक्षित या संमेलनाचे उद्घाटक तर कामगार मंत्री डॉ. सुरेश खाडे स्वागताध्यक्ष आहेत. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे कल्याण आयुक्त रविराज इळवे या संमेलनाचे प्रमुख कार्यवाह आहेत.




डॉ.भवाळकर यांनी लोकसंस्कृती विषयी विपूल लेखन केले असून मराठी विश्वकोश, मराठी ग्रंथकोश आदी महत्त्वाच्या कार्यात त्यांचे योगदान आहे. तसेच नाटक, कथासंग्रह, वैचारिक, ललित लेखन, समीक्षात्मक अशा विविध प्रकारची साहित्य निर्मिती त्यांनी केली आहे.

संमेलनाच्या पहिल्या सत्रात चला उद्योजक होऊ' या विषयावर डॉ विठ्ठल कामत (कामत हॉटेल्स गृप लि.), गिरीश चितळे (चितळे उद्योग समूह), हनुमंतराव गायकवाड (भारत विकास गृप इंडिया लि.) या उद्योजकांची मुलाखत होणार आहे. दोन दिवस चालणाऱ्या या संमेलनात कामगार चळवळीची कथा आणि व्यथा', मराठी साहित्यात कामगार जिवनाचे चित्र शोधताना', आम्ही का लिहितो ?', व्यसनमुक्तीची लढाई' या विषयांवर परिसंवादांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचबरोबर कवी संमेलन आणि काव्य मैफिलीचा रसिक प्रेक्षकांना आस्वाद घेता येणार आहे. निमंत्रित तसेच कामगार कवींचा कवी संमेलनात सहभाग असेल. संमेलनात कथाकथनाचे सादरीकरण होणार असून अभिरुप न्यायालय देखील भरवले जाणार आहे. आदर्श गाव हिवरे बाज़ारचे सरपंच पद्मश्री पोपटराव पवार या अभिरुप न्यायालय कार्यक्रमात सहभागी होणार आहेत, अशी माहिती मंत्री श्री. खाडे यांनी दिली.

विभागामार्फत संमेलनासाठी इच्छूक कामगारांची नोंदणी करण्यात येत असून अधिक माहितासाठी महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या www.public.mlwb.in या संकेतस्थळास अथवा नजीकच्या कामगार कल्याण केंद्रास व कार्यालयास भेट द्यावी, असे आवाहन मंत्री डॉ.खाडे यांनी यावेळी केले.



# सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेचा २५ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**सांगली/बंधुता वृत्तसेवा**

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेचा २५ वा वर्धापन



डॉ. चाटे होमिओपॅथी क्लिनिक
संपर्क : 7385727107
। मुंबई । औरंगाबाद । पुणे । नाशिक

पुढारी

# मिरजेत कामगार साहित्य संमेलन

**सांगली / प्रतिनिधी :** सतरावे राज्यस्तरीय कामगार साहित्य संमेलन दि. २४ व २५ फेब्रुवारी २०२३ रोजी मिरज येथे होणार आहे. या संमेलनात सर्व कामगारांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होण्याचे आवाहन कामगार मंत्री डॉ. सुरेश खाडे यांनी केले. या दोन दिवसीय संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. तारा भवाळकर यांची निवड करण्यात आली असून महाराष्ट्र विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ. राजा दीक्षित या संमेलनाचे उद्घाटक तर कामगार मंत्री डॉ. सुरेश खाडे स्वागताध्यक्ष आहेत. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे आयुक्त रविराज इळवे या संमेलनाचे प्रमुख कार्यवाह आहेत.

# इस्लामपुरात जयंत कबड्डी

उद्या उद्घाटन : राज्यातील तीन हजार कामगारांची उपस्थिती

# मिरजेतील कामगार साहित्य संमेलनाची तयारी पूर्णत्वाकडे

लोकमत न्यूज नेटवर्क

मिरज : मिरजेत सतरावे राज्यस्तरीय कामगार साहित्य संमेलन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. तारा भवाळकर यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार, दि. २४ व २५ फेब्रुवारी रोजी बालगंधर्व नाट्यमंदिरात लोकशाहीर अण्णा भाऊ साठे साहित्यनगरीत होत आहे. राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ. राजा दीक्षित संमेलनाचे उद्घाटक असून, कामगारमंत्री सुरेश खाडे स्वागताध्यक्ष आहेत. संमेलनाची तयारी पूर्ण झाली आहे. राज्यातील तीन हजार कामगार व कुटुंबीय संमेलनास उपस्थित राहणार आहेत. राज्य कामगार कल्याण मंडळाचे कल्याण आयुक्त व संमेलनाचे प्रमुख कार्यवाह रविराज इळवे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

सकाळी ९.३५ वाजता विंदा बालमंचाचे उद्घाटनं करण्यात येईल. त्यानंतर डॉ. शंकरराव खरात ग्रंथदालन व लोकशाहीर पठ्ठे बापूराव कविता भिंतीचे उद्घाटन करण्यात येणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारमंचावर संमेलनाचा उद्घाटन सोहळा व सर्व सत्रांचे आयोजन होणार आहे.

सकाळी १० वाजता संमेलनाचे उद्घाटन होईल. संमेलनाच्या पहिल्या सत्रात 'चला उद्योजक होऊ' या विषयावर डॉ. विठ्ठल कामत (कामत हॉटेल्स ग्रुप लि.), रामदास माने (माने ग्रुप ऑफ कंपनीज), हनुमंतराव गायकवाड (भारत विकास ग्रुप इंडिया लि.), गिरीश चितळे (चितळे उद्योग समूह) या उद्योजकांची प्रकट मुलाखत होणार आहे.

दोनदिवसीय संमेलनात 'कामगार चळवळीची कथा व व्यथा', 'मराठी साहित्यात कामगार जीवनाचे चित्र शोधताना', 'आम्ही का लिहितो?', 'व्यसनमुक्तीची लढाई' या विषयांवर परिसंवाद, कविसंमेलन व काव्यमैफलीचा प्रेक्षकांना आस्वाद घेता येणार आहे.

संमेलनात कथाकथनाचे सादरीकरण व अभिरूप न्यायालयही भरविण्यात येणार आहे. आदर्श गाव हिवरे बाजारचे सरपंच पद्मश्री पोपटराव पवार अभिरूप न्यायालयामध्ये सहभागी होणार आहेत. कामगार साहित्य संमेलनाचे थेट प्रक्षेपण मंडळाच्या महाकल्याण यू-ट्यूब चॅनेलवर तसेच फेसबुक पेजवर करण्यात येणार आहे. कामगार साहित्य संमेलनासाठी सुमारे २२ लाख रुपये खर्च करण्यात येणार असल्याचेही आयुक्त इळवे यांनी सांगितले.

## संमेलनापूर्वी ग्रंथदिंडीचे आयोजन

संमेलनाच्या उद्घाटनापूर्वी शुक्रवार, दि. २४ रोजी सकाळी ७.४५ वाजता शहरात ग्रंथदिंडी काढण्यात येणार आहे. मंगळवार पेठेत छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापासून ग्रंथदिंडीस सुरुवात होईल. सराफ कट्टा, लक्ष्मी मार्केट, महापालिका कार्यालय या मार्गाने स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर प्रवेशद्वार बालगंधर्व नाट्यमंदिर येथे ग्रंथदिंडीचा समारोप होईल.

मराठी अस्मितेचा बुलंद आवाज. https://epapervrittamanas.in/
# वृत्तमानस
मुंबई/ पालघर शनिवार, ११ फेब्रुवारी २०२३ वर्ष- २६ अंक-२३२ पाने- ८

## 7 वे राज्यस्तरीय कामगार साहित्य संमेलन मिरजेत

# संमेलनाध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिका डॉ.तारा भवाळकर, उद्घाटक डॉ.राजा दीक्षित

■ मुंबई

१७ व्या राज्यस्तरीय कामगार साहित्य संमेलनाचे दि.२४ व २५ फेब्रुवारी २०२३ रोजी मिरज, जि.सांगली येथे आयोजन करण्यात आले असून संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिका डॉ.तारा भवाळकर यांची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती कामगार मंत्री तथा संमेलनाचे स्वागताध्यक्ष ना.डॉ.सुरेश (भाऊ) खाडे यांनी दिली. मंत्रालय मुंबई येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, डॉ.भवाळकर यांनी लोकसंस्कृतीविषयी विपूल लेखन केले असून मराठी विश्वकोश, मराठी ग्रंथकोश आदी महत्वाच्या कार्यात त्यांचे योगदान आहे. तसेच नाटक, कथासंग्रह, वैचारिक, ललित लेखन, समीक्षात्मक अशा विविध प्रकारची साहित्य निर्मिती त्यांनी केली आहे. त्यामुळे संमेलनाध्यक्ष पदासाठी त्यांची निवड करण्यात आली आहे.

महाराष्ट्र विश्वकोष निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ.राजा दीक्षित या संमेलनाचे उद्घाटक असून कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनीता वेद सिंगल मार्गदर्शक तर महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे कल्याण आयुक्त रविराज इळवे संमेलनाचे प्रमुख कार्यवाह आहेत. बालगंधर्व नाट्य मंदिर, मिरज, जि.सांगली येथे संमेलन होणार आहे. शुक्रवार, दि.२४ फेब्रुवारी रोजी सकाळी ग्रंथदिंडी काढण्यात येईल. सकाळी १० वाजता संमेलनाचा उद्घाटन सोहळा होईल.


संमेलनाच्या पहिल्या सत्रात चला उद्योजक होऊ या विषयावर डॉ.विठ्ठल कामत (कामत हॉटेल्स गृप लि.), गिरीश चितळे (चितळे उद्योग समुह), हनुमंतराव गायकवाड (भारत विकास गृप इंडिया लि.) या उद्योजकांची प्रकट मुलाखत होणार आहे. दोन दिवस चालणाऱ्या या संमेलनात कामगार चळवळीची कथा आणि व्यथा, मराठी साहित्यात कामगार जिवनाचे चित्र शोधताना, आम्ही का लिहितो?, व्यसनमुक्तीची लढाई या विषयांवर परिसंवादांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचबरोबर कवींचे कवी संमेलन आणि काव्य मैफिलीचा रसिक प्रक्षेकांना आस्वाद घेता येणार आहे. निमंत्रित तसेच कामगार कवींचा कवी संमेलनात सहभाग असेल. संमेलनात कथाकथनाचे सादरीकरण होणार असून अभिरुप न्यायालय देखील भरवले जाणार आहे.

आदर्श गाव हिवरे बाजारचे सरपंच पद्मश्री पोपटराव पवार अभिरुप न्यायालयात आरोपीच्या पिंजऱ्यात असतील. संमेलनासाठी इच्छुक कामगारांची नोंदणी करण्यात येत असून अधिक माहितासाठी महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या www.public.mlwb.in या संकेतस्थळास अथवा नजीकच्या कामगार कल्याण केंद्रास व कार्यलयास भेट द्यावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

### *मान्यवर साहित्यिकांनी भूषवले आहे संमेलनाचे अध्यक्षपद*

*यापुर्वी कविवर्य नारायण सुर्वे, बाबूराव बागुल, डॉ.आनंद यादव, डॉ.सदा कऱ्हाडे, अरुण साधू, उत्तम तुपे, शिवाजी सावंत, नामदेव ढसाळ, डॉ.विठ्ठल वाघ, मधु मंगेश कर्णिक, प्रा.केशव मेश्राम, डॉ.अनिल अवचट, उत्तम कांबळे, फ.मु.शिंदे, डॉ.रुपा कुलकर्णी, रामदास फुटाणे यांनी कामगार साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविले आहे.कामगार क्षेत्रात काम करताकरता वाचकांची साहित्य अभिरुची आणि वास्तव जीवनाचे प्रत्यक्ष चित्रण आपल्या लेखनात करणारे नामवंत साहित्यिक,कवी या संमेलनाला अध्यक्ष म्हणून लाभले आहे.*

# संमेलन ठरेल कामगारांचा हुंकार



रविराज इळवे

**मिरजेत दोन दिवसीय १७ वे कामगार साहित्य संमेलन सुरू आहे. या संमेलनाचे प्रमुख कार्यवाह व महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे आयुक्त रविराज इळवे यांनी संमेलन आयोजनामागची मांडलेली भूमिका.**

वेदना ही या जगातील प्रत्येक कामगाराच्या पाचवीला पुजली आहे. वेदनेतून नव्या दमदार, कसदार साहित्यनिर्मितीची प्रक्रिया होत असते. महाराष्ट्रात कामगार, मालक, सरकारी यंत्रणा आणि सामाजिक व्यवस्थेची एक चांगली साखळी निर्माण व्हावी, यासह नव्या पिढीतील कामगारांचे जगणे अधिक समृद्ध व्हावे, हा या कामगार साहित्य संमेलनाच्या संयोजनाचा प्रमुख उद्देश आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यातून कामगार प्रतिनिधी संमेलनासाठी आले आहेत. तीन हजारांवर विक्रमी सदस्य नोंदणी झाली आहे, ही यशस्वितेची पावती आहे. उपेक्षितांच्या जगण्यासाठीचा संघर्ष अधोरेखित करणारे साहित्य आणि त्याच्या निर्मितीचा मुख्य स्रोत असलेल्या कामगारांना एकत्र आणण्यासाठी संमेलन उपयुक्त ठरेल. त्यांना आवाज देणारी ही परंपरा पुन्हा नव्याने सुरू होत आहे. महाराष्ट्रातील कामगारांच्या साहित्याने केवळ मराठीच नव्हे, तर जगातील इंग्रजी, रशियन, जपानी यांसह अनेक भाषांमधील कोट्यवधी वाचकांना वेड लावले. हा इतिहास अगदी फार पूर्वीचा नाही. हे साहित्य जसे अजरामर झाले, तसेच कामगारांच्या, कष्टकऱ्यांच्या नव्या पिढीचे कसदार साहित्य प्रसिद्ध होण्यासाठी हे साहित्य संमेलन अधिक उपयुक्त ठरेल.

**आज असंघटित कामगारांचा संघर्ष मोठा आहे. बहिणाबाई म्हणतात -**

**जग जग रे मानसा,**
**तुझं जगनं मोलाचं**
**उच्च गगनाएवढं**
**धरित्रीच्या रे तोलाचं...**

माणूस हा खऱ्या अर्थाने जगताना केवळ गगनाची उंची गाठू शकत नाही, तर आपल्या धरित्रीचे, पर्यायाने पृथ्वीचे मोल परत देण्यासाठी त्याने ज्ञान, विज्ञान, सामाजिक भावना जोपासून जगणं बहिणाबाईंना अपेक्षित आहे. नेमका हाच संदेश या संमेलनातून द्यायचा प्रयत्न आहे. कामगार कल्याण मंडळाच्या माध्यमातून सध्याच्या असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कोट्यवधी कामगारांना अशा साहित्य संमेलनांतून निश्चित प्रेरणा मिळेल. आमचे मंडळ केवळ कामगार साहित्य संमेलनासारखा उपक्रम राबवत नाही. कामगारांच्या विविध कला-गुणांना वाव मिळावा, या उद्देशाने राज्य स्तरावरील नाट्यस्पर्धा, कबड्डी आणि कुस्ती स्पर्धा असे उपक्रम कामगार मंडळाने राबवले आहेत. यामध्ये सर्वांत अवघड उपक्रम हा साहित्य संमेलनाचे संयोजन असल्याची कबुलीही त्यांनी दिली. सलग सतरा वर्षे बंद पडलेले संमेलन पुन्हा सुरू करणे आणि त्यासाठीची तयारी हे आव्हान आमच्या मंडळाने केवळ कामगार मंत्री सुरेश खाडे यांच्यामुळे पाठबळामुळे आणि अधिकारी वर्गाच्या राबणुकीमुळेच लीलया पार पाडले. यासाठी मिरजेच्या आणि परिसरातील जनतेने आणि साहित्यिकांनी केलेले सहकार्यही अविस्मरणीय आहे.

\- प्रमोद जेरे

उपआयुक्त राहुल रोकडे, उपआयुक्त यमगर, तोफिक शिकलगार, जमीर माझी वसुंधरा अंतर्गत आहे.

नजी बोहरा
ी उभारणी



रीक समाज बांधव मोठ्या संख्येने पस्थित होते. या कामात ल्याणपुरातील पारीक माजातील युवकांचे मोलाचे हकार्य लाभले.

# कामगार पाल्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम

मुंबई - कामगार कल्याण मंडळाच्या माध्यमातून कामगारांच्या पाल्यांना कला, क्रीडा क्षेत्रात संधी उपलब्ध होण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. कामगारांच्या पाल्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात येतील, असे प्रतिपादन कामगारमंत्री डॉ. सुरेश खाडे यांनी येथे केले.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या श्रमिक जिमखाना येथे आयोजित राज्यस्तरीय कामगार केसरी व कुमार केसरी कुस्ती स्पर्धेचे बक्षीस वितरण समारंभाच्यावेळी मंत्री डॉ. खाडे बोलत होते. यावेळी कामगार कल्याण आयुक्त रविराज इळवे, मुंबई शहर जिल्हा क्रीडा अधिकारी अभय चव्हाण, मुंबई शहर तालिम मंडळाचे उपाध्यक्ष शशिकांत देशमुख, महेंद्र तायडे आदी उपस्थित होते.

मंत्री डॉ. खाडे म्हणाले, राज्यात राजर्षी शाहू महाराज यांनी कुस्तीला प्रोत्साहन दिले. त्यांचा वारसा राज्याने जोपासला आहे. कुस्ती क्षेत्रातही नवनवीन बदल आणि तंत्रज्ञान आले आहे. मातीवरील कुस्ती आता मॅटवर होत आहे. हा बदल कुस्तीपटूंनी स्वीकारावा. खेळ म्हटला, की यश- अपयश येत राहते. मात्र, खेळाडूंनी अपयशाने खचून न जाता यशासाठी पुन्हा नव्याने तयारी करावी. कामगार कल्याण विभागाचे आयुक्त श्री. इळवे यांनी प्रास्ताविकातून या स्पर्धेची माहिती दिली. माधवी सुर्वे यांनी आभार मानले.

या राज्यस्तरीय.कुमार केसरी स्पर्धेत अरू हिंदुराव खांडेकर, तर राज्यस्तरीय कामगार केसरी स्पर्धेत कालिचरण झुंजार सोलनकर यांनी विजेतेपद पटकावले. त्यांना अनुक्रमे चांदीची गदा, स्मृती चिन्ह, प्रमाणपत्र आणि ५० व ७५ हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात आले. याशिवाय अभिनंदन बोडके याने द्वितीय, ओंकार शिवाजी मगदूम याने तृतीय, तर विवेक कृष्णाजी धावडे याने उत्तेजनार्थ पारितोषिक पटकावले. दुसऱ्या गटात भारत संजय पवार याने द्वितीयं, प्रथमेश बाबा गुरव तृतीय, तर तानाजं सोपानराव विटकर याने उत्तेजनाथ पारितोषिक पटकावले. त्यांना स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र आणि रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले.

# १७ वे राज्यस्तरीय कामगार साहित्य संमेलन मिरजेत

मुंबई - १७ व्या राज्यस्तरीय कामगार साहित्य संमेलनाचे २४ व २५ फेब्रुवारी २०२३ रोजी मिरज, जि.सांगली येथे आयोजन करण्यात आले असून, संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिका डॉ. तारा भवाळकर यांची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती कामगार मंत्री तथा संमेलनाचे स्वागताध्यक्ष डॉ.सुरेश (भाऊ) खाडे यांनी दिली. मंत्रालय मुंबई येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, डॉ.भवाळकर यांनी लोकसंस्कृतीविषयी विपूल लेखन केले असून मराठी विश्वकोश, मराठी ग्रंथकोश आदी महत्त्वाच्या कार्यात त्यांचे योगदान आहे. तसेच नाटक, कथासंग्रह, वैचारिक, ललित लेखन, समीक्षात्मक अशा विविध प्रकारची साहित्य निर्मिती त्यांनी केली आहे. त्यामुळे संमेलनाध्यक्षपदासाठी त्यांची निवड करण्यात आली आहे.

महाराष्ट्र विश्वकोष निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ.राजा दीक्षित या संमेलनाचे उद्घाटक असून, कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनीता वेद सिंगल मार्गदर्शक, तर महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे कल्याण आयुक्त रवीराज इळवे संमेलनाचे प्रमुख कार्यवाह आहेत. बालगंधर्व नाट्य मंदिर, मिरज, जि. सांगली येथे संमेलन होणार आहे. शुक्रवार, २४ फेब्रुवारी रोजी सकाळी ग्रंथदिंडी काढण्यात येईल. सकाळी १० वाजता संमेलनाचा उद्घाटन सोहळा होईल.

MumbaiChoufer Edition
Feb 11, 2023 Page No. 3
Powered by : eReleGo.com

महासंवाद
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

# राज्यस्तरीय कामगार साहित्य संमेलनाचे २४ व २५ फेब्रुवारी रोजी मिरज येथे आयोजन – कामगारमंत्री डॉ. सुरेश खाडे

by Team DGIPR February 8, 2023 वृत्त विशेष




मुंबई, दि. ८ :- सतराव्या राज्यस्तरीय कामगार साहित्य संमेलनाचे आयोजन दि. २४ व २५ फेब्रुवारी २०२३ रोजी मिरज, जि. सांगली येथे करण्यात आले असून सर्व कामगारांनी या संमेलनात उत्स्फूर्तपणे सहभागी होण्याचे आवाहन कामगार मंत्री ना. डॉ. सुरेश खाडे यांनी आज येथे केले. मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेत मंत्री डॉ.खाडे यांनी संमेलनाबाबत माहिती दिली.

बालगंधर्व नाट्य मंदिर, मिरज, जि.सांगली येथे हे संमेलन होणार असून शुक्रवार, दि. २४ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता संमेलनाचे उद्घाटन होणार आहे. विभागामार्फत संमेलनासाठी इच्छुक कामगारांची नोंदणी करण्यात येत असून अधिक माहितासाठी महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या www.public.mlwb.in या संकेतस्थळास अथवा नजीकच्या कामगार कल्याण केंद्रास व कार्यलयास भेट द्यावी, असे आवाहन मंत्री डॉ.खाडे यांनी यावेळी केले.

या दोन दिवसीय संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिका डॉ. तारा भवाळकर यांची निवड करण्यात आली असून महाराष्ट्र विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ. राजा दीक्षित या संमेलनाचे उद्घाटक तर कामगारमंत्री ना. डॉ. सुरेश खाडे स्वागताध्यक्ष असून महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे कल्याण आयुक्त रविराज इलदे या संमेलनाचे प्रमुख कार्यवाह आहेत.

डॉ.भवाळकर यांनी लोकसंस्कृतीविषयी विपुल लेखन केले असून मराठी विश्वकोश, मराठी ग्रंथकोश आदी महत्वाच्या कार्यात त्यांचे योगदान आहे. तसेच नाटक, कथासंग्रह, वैचारिक, ललित लेखन, समीक्षात्मक अशा विविध प्रकारची साहित्य निर्मिती त्यांनी केलेली आहे.
संमेलनाच्या पहिल्या सत्रात 'चला उद्योजक होऊया' विषयावर डॉ. विठ्ठल कामत (कामत हॉटेल्स ग्रुप लि.), गिरीश चितळे (चितळे उद्योग समुह), हनुमंतराव गायकवाड (भारत विकास ग्रुप इंडिया लि.) या उद्योजकांची प्रकट मुलाखत होणार आहे. दोन दिवस चालणाऱ्या या संमेलनात कामगार चळवळीची कथा आणि व्यथा', 'मराठी साहित्यात कामगार जीवनाचे चित्र शोधताना', 'आम्ही का लिहितो ?', 'व्यसनमुक्तीची लढाई या विषयांवर परिसंवादांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचबरोबर कवींचे कवी संमेलन आणि काव्य मैफिलीचा रसिक प्रक्षेकांना आस्वाद घेता येणार आहे. निमंत्रित तसेच कामगार कवींचा कवी संमेलनात सहभाग असेल. संमेलनात कथाकथनाचे सादरीकरण होणार असून अभिरुप न्यायालयदेखील भरवले जाणार आहे. आदर्श गाव हिवरे बाजारचे सरपंच पद्मश्री पोपटराव पवार अभिरुप न्यायालय कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.

0000

वंदना थोरात/ससं/